दैनिक
# हिंदू प्रकाशवार्ता
epaper.hinduprakashwarta.com
PRGI No.: MHMAR/25/A2358
Web portal : hinduprakashwarta.com
सत्याचा प्रकाश, राष्ट्रवादाचा प्रहरी

छत्रपती संभाजीनगर ❀ शनिवार, दि. २७ जून २०२६ ❀ वर्ष : १ ❀ अंक : ६८ ❀ पाने : ४ ❀ किंमत : ४ रू. ❀ Email : hinduprakashvarta@gmail.com

## 'ऑपरेशन सिंदूर'मधील शहीद सहा जवानांची नावे जाहीर

**जम्मू :** जम्मू-काश्मीरमधील पहलगाम येथे झालेल्या भीषण दहशतवादी हल्ल्यानंतर भारताने राबवलेल्या 'ऑपरेशन सिंदूर' दरम्यान देशासाठी सर्वोच्च बलिदान देणाऱ्या सहा जवानांची नावे केंद्र सरकारने प्रथमच अधिकृतपणे जाहीर केली आहेत. या घोषणेमुळे देशभरातून शहीद जवानांना श्रद्धांजली वाहिली जात असून त्यांच्या शौर्याची कायमस्वरूपी नोंद राष्ट्रीय युद्ध स्मारकावर केली जाणार आहे. २२ एप्रिल २०२५ रोजी पहलगामच्या बैसरन खोऱ्यात दहशतवाद्यांनी पर्यटकांवर अंधाधुंद गोळीबार केला होता.

पाहिजेत

श्री वरद कन्स्ट्रक्शन कंपनी संभाजीनगर येथे 3 वर्ष अनुभव असलेल्या सिव्हिल इंजिनिअर च्या जागा भरणे आहे.इच्छुक उमेदवार यांनी ईमेल आयडी नंबर shrivaradconstructionco@gmail.comवर आपले अर्ज पाठवावे किंवा मोबाईल नंबर 9923104521/9226611011वर संपर्क साधावा.

कार्यालय : श्री वरद कन्स्ट्रक्शन कंपनी, नंबर 515,5वा माळा, वास्तू इलाईट स्क्वेअर बीड बायपास रोड छत्रपती संभाजी नगर येथे कार्यालयीन वेळेत समक्षात भेटावे.

## थोडक्यात वार्ता

### अयोध्या दान घोटाळा प्रकरण : चंपत राय आणि अनिल मिश्रा यांचा राजीनामा

**अयोध्या :** राम मंदिर दान घोटाळा प्रकरणात मोठी घडामोड समोर आली आहे. श्रीराम जन्मभूमी तीर्थ क्षेत्र ट्रस्टचे महासचिव चंपत राय आणि ट्रस्टचे सदस्य अनिल मिश्रा यांनी आपल्या पदाचा राजीनामा दिल्याची माहिती समोर आली आहे. या प्रकरणामुळे गेल्या काही दिवसांपासून देशभरात चर्चा सुरू असून, आता या राजीनाम्यांमुळे या चर्चेला आणखी वेग आला आहे. राम मंदिरातील देणग्या आणि इतर मौल्यवान वस्तूंच्या व्यवस्थापनाबाबत काही गंभीर आरोप करण्यात आले होते. या पार्श्वभूमीवर सरकारने विशेष तपास पथकामार्फत चौकशी सुरू केली आहे. या चौकशीत पुढे काय निष्कर्ष समोर येतात, याकडे सर्वांचे लक्ष लागले आहे. दरम्यान, चंपत राय आणि अनिल मिश्रा यांनी नेमका कोणत्या कारणामुळे राजीनामा दिला, याबाबत ट्रस्टकडून अधिकृत माहिती देण्यात आलेली नाही. मात्र, या प्रकरणाची सखोल चौकशी व्हावी, अशी मागणी विविध स्तरातून करण्यात येत होती. काही संघटनांनी तसेच विरोधी पक्षांनीही या प्रकरणात सर्व संबंधितांची चौकशी करण्याची मागणी केली होती.

### टीईटी परीक्षेत सीसीटीव्हीमध्ये चेहरा दिसणे बंधनकारक

**मुंबई :** महाराष्ट्र शिक्षक पात्रता परीक्षेसाठी महिला उमेदवारांना बुरखा, दुपट्टा किंवा ओढणी परिधान करण्याचे स्वातंत्र्य राहील. मात्र परिक्षा सुरू असताना वर्गखोलीत उमेदवाराचा चेहरा स्पष्ट दिसणे बंधनकारक असेल, असे महाराष्ट्र राज्य परीक्षा परिषदेने स्पष्ट केले आहे. महाराष्ट्र राज्य परिक्षा परिषदेतर्फे येत्या २८ जूनला शिक्षक पात्रता परीक्षा घेतली जाणार आहे. गेल्या काही काळापासून परिक्षांमधील वाढते गैरप्रकार आणि डमी उमेदवारांचे रॅकेट पाहता परिक्षा परिषदेने यंदा सर्व परीक्षा केंद्रांवर 'लाइव्ह सीसीटीव्ही यंत्रणा' कार्यान्वित केली आहे. अशा स्थितीत चेहरा झाकलेल्या उमेदवारांमुळे ओळख पटवणे अशक्य होते. डॉ. बेडसे यांनी दिलेल्या माहितीनुसार, परिक्षेची पारदर्शकता आणि विश्वासार्हता टिकवून ठेवण्यासाठी ओळख आणि बायोमेट्रिक पडताळणीसह सीसीटीव्ही कॅमेऱ्यामध्ये उमेदवाराचा चेहरा स्पष्ट दिसणे आवश्यक आहे. उच्च न्यायालयाच्या निरीक्षणांचा संदर्भ देत त्यांनी सांगितले की, यूपीएससी, एमपीएससी, स्टाफ सिलेक्शन कमिशन अशा विविध परीक्षांमध्येही चेहरा झाकण्याला प्रतिबंध करण्यात आला आहे.

### अमरनाथ यात्रेचे वेळापत्रक जाहीर

**श्रीनगर :** दरवर्षीप्रमाणे यंदाही लाखो भाविकांचे श्रद्धास्थान असलेल्या अमरनाथ गुहेतील नैसर्गिक बर्फाच्या शिवलिंगाच्या दर्शनासाठी 'अमरनाथ यात्रा २०२६'चे अधिकृत नियोजन जाहीर झाले आहे. काश्मीरच्या हिमालयीन पर्वतरांगांमध्ये वसलेल्या या पवित्र गुहेच्या दर्शनासाठी जाणाऱ्या भाविकांच्या सोयीसाठी श्री अमरनाथजी श्राइन बोर्डाने सविस्तर मार्गदर्शक सूचना जारी केल्या आहेत.

**यात्रेचा कालावधी आणि महत्त्वाच्या तारखा :** श्री अमरनाथजी श्राइन बोर्डाने दिलेल्या माहितीनुसार, यंदाची अमरनाथ यात्रा ३ जुलै २०२६ रोजी सुरू होणार असून २८ ऑगस्ट २०२६ रोजी संपन्न होईल. भाविकांसाठी ही यात्रा एकूण ५७ दिवसांची असेल. गेल्या वर्षीच्या तुलनेत यंदा यात्रेचा कालावधी वाढवण्यात आला असल्याने भाविकांना दर्शनासाठी अधिक सवड मिळणार आहे.

**नोंदणी प्रक्रिया :** ऑनलाइन आणि ऑफलाइन पर्याय- यात्रेसाठीची नोंदणी प्रक्रिया १५ एप्रिल २०२६ पासून सुरू झाली आहे.

**आरोग्यविषयक निकष आणि पात्रता :** अमरनाथ यात्रा हा अतिशय दुर्गम आणि उंच डोंगराळ भागातील प्रवास असल्याने, आरोग्याच्या दृष्टीने काही कडक नियम लागू करण्यात आले आहेत. १३ ते ७० वयोगटातील भाविकच यात्रेसाठी पात्र असतील.

### "खरं की काय"




# कोट्यवधींची नालेसफाई कागदावरच? वृत्तानंतर प्रशासन जागे; तरीही शहर पूराच्या उंबरठ्यावर

## 'हिंदू प्रकाशवार्ता'च्या वृत्तानंतर महापौर, आयुक्त आणि स्थायी समिती सभापतींची संयुक्त पाहणी

- कोट्यवधींचा चुराडा अन् नाले गाळातच
- दोन महिने बैठकांचा फार्स
- कंत्राटदार आणि अधिकाऱ्यांचे उखळ पांढरे
- गाळ कडेलाच; पुन्हा 'जैसे थे' कारभार
- नेत्यांची 'दौरेबाजी' आणि नागरिकांचे मरण
- हलगर्जी कंत्राटदारांवर कारवाई कधी होणार




हिंदू प्रकाशवार्ता | सिद्धेश्वर थोर

**छत्रपती संभाजीनगर :** पावसाळ्याच्या पहिल्याच सरींनी शहरातील नालेसफाईच्या दाव्यांची पोलखोल केली आणि 'हिंदू प्रकाशवार्ता' ने प्रसिद्ध केलेल्या "अल्टिमेटमवर अल्टिमेटम, तरी नाले गाळातच" या वृत्ताची अखेर महापालिका प्रशासनाला दखल घ्यावी लागली. वृत्त प्रसिद्ध झाल्यानंतर महापौर समीर राजूरकर, मनपा आयुक्त अमोल येडगे आणि स्थायी समिती सभापती अनिल मकरीये यांनी औषधी भवन परिसरातील नाल्याची संयुक्त पाहणी केली.




महापालिकेकडून दरवर्षी नालेसफाईसाठी कोट्यवधी रुपयांचा निधी खर्च केला जातो. पावसाळ्यापूर्वी बैठका, आदेश, आढावे आणि पाहण्यांचा धडाका सुरू असतो. यंदाही ७ मेपासासून नालेसफाई मोहीम सुरू करण्यात आली. संबंधित अधिकाऱ्यांना वारंवार अल्टिमेटम देण्यात आले. मात्र, १७ जून रोजी झालेल्या पाहणीत केवळ ५० टक्केच काम पूर्ण झाल्याचे समोर आले. त्यानंतरही शहरातील अनेक नाल्यांमध्ये गाळ, कचरा आणि अतिक्रमण कायम असल्याचे वास्तव 'हिंदू प्रकाशवार्ता' ने छायाचित्रांसह उघड केले.

वृत्तानंतर झालेल्या संयुक्त पाहणीत औषधी भवन परिसरातील नाल्यात जेसीबी उतरविण्यास जागा नसल्याने साफसफाईला अडथळे येत असल्याचे स्पष्ट झाले. याशिवाय सुमारे २५० घरांचे ड्रेनेज थेट नाल्यात सोडले जात असल्याने पावसाळ्यात पाणी घरांमध्ये घुसत असल्याची गंभीर बाबही समोर आली. प्लास्टिक व थर्माकोल अडविण्यासाठी बॅरियर उभारणे, ड्रेनेज मुख्य लाईनला जोडणे आणि कायमस्वरूपी उपाययोजना करण्याचे निर्देश अधिकाऱ्यांनी दिले.


**अपूर्ण नालेसफाई तातडीने पूर्ण करणे, नालेसफाईवरील खर्चाचा पारदर्शक हिशोब जाहीर करणे, प्रत्यक्ष कामांचे स्वतंत्र तांत्रिक परीक्षण करणे आणि हलगर्जीपणा करणाऱ्या अधिकारी व कंत्राटदारांवर कठोर कारवाई करावी अशी मागणी नागरिकांकडून होत आहे.**

या समस्या आज प्रशासनाला दिसत असतील, तर गेल्या दोन महिन्यांतील पाहण्या, बैठका आणि आदेशांदरम्यान त्या का दिसल्या नाहीत असा सवाल नागरिक करत आहे नालेसफाईचे काम वेळेत आणि दर्जेदार झाले असते, तर संयुक्त पाहणीची वेळच आली नसती, अशी भावना नागरिक व्यक्त करत आहेत.

मोती कारंजा, गांधीनगर, औषधी भवन, संभाजीपेठ, नाथ मार्केट, दुल्हा-दुल्हन चौक, समर्थनगरसह अनेक भागांत अजूनही नाल्यांमध्ये मोठ्या प्रमाणात गाळ साचलेला आहे. अनेक ठिकाणी नाल्यातून काढलेला गाळ नाल्याच्या कडेलाच टाकून ठेवण्यात आला असून, पुढील पावसात तो पुन्हा नाल्यात वाहून जाण्याची शक्यता आहे. त्यामुळे नालेसफाईच्या गुणवत्तेवर आणि त्यासाठी झालेल्या कोट्यवधी रुपयांच्या खर्चावर गंभीर प्रश्नचिन्ह निर्माण झाले आहे.

दरवर्षी पावसाळ्यापूर्वी आश्वासने दिली जातात, पाहण्या होतात, आदेश निघतात; मात्र पहिल्याच पावसात शहरातील अनेक भाग जलमय होतात. घरांमध्ये पाणी शिरते, वाहतूक विस्कळीत होते आणि नागरिकांना मोठा त्रास सहन करावा लागतो. 'हिंदू प्रकाशवार्ता'च्या वृत्तानंतर प्रशासनाने तातडीने पाहणी केली, ही बाब स्वागतार्ह असली तरी आता नागरिकांना पाहणी नव्हे, तर प्रत्यक्ष परिणाम अपेक्षित आहेत.

# एका पंधरवड्यात 6 हजार कोटी रुपयांचे ड्रग्ज जाळणार



नवी दिल्ली : पुढील १५ दिवसांत संपूर्ण देशात ६००० कोटी रुपये किमतीचे दोन लाख किलोपेक्षा जास्त ड्रग्ज जाळले जाणार आहेत. गृहमंत्री अमित शाह (AmitShah) शुक्रवारी 'नार्को को-ऑर्डिनेशन सेंटर' (ENCORE) च्या १० व्या बैठकीदरम्यान ड्रग्ज नष्ट करण्याच्या पंधरवड्याची (Fortnight) सुरुवात करतील. यासोबतच, शाह आगामी तीन वर्षांसाठी अंमली पदार्थांच्या तस्करीवर नियंत्रण मिळवण्यासाठी तयार केलेले 'व्हिजन डॉक्युमेंट' देखील जारी करतील.

गृह मंत्रालयाच्या सूत्रांनुसार, शुक्रवारी एनकोर्डच्या बैठकीत अंमली पदार्थांच्या समस्येशी निपटण्यासाठी सुरू असलेल्या सामूहिक राष्ट्रीय प्रयत्नांचा आढावा घेतला जाईल. मोदी सरकारचे ड्रग्जविरोधात 'झिरो टॉलरन्स' धोरण असून, अमित शाह यांनी स्पष्ट केले आहे की, भारतात एक ग्रॅमही ड्रग्ज येऊ दिले जाणार नाही आणि भारतातून दुसऱ्या देशातही एक ग्रॅम ड्रग्ज जाऊ दिले जाणार नाही.

एनकोर्डची स्थापना याच उद्देशाने करण्यात आली आहे. हायब्रिड मोडमध्ये बोलावलेल्या या बैठकीत ४४ केंद्रीय मंत्रालयांचे प्रमुख आणि ड्रग्जविरुद्ध काम करणाऱ्या एजन्सींचे शंभरहून अधिक अधिकारी उपस्थित राहतील. जप्त केलेले ड्रग्ज नष्ट करण्यासाठी संपूर्ण देशात पंधरवडा साजरा केला जातो, ज्यामध्ये विविध ठिकाणी ड्रग्ज जाळण्याचे काम केले जाते.

# महेश दीक्षित यांची आयबी (IB) प्रमुखपदी नियुक्ती

**नवी दिल्ली :** केंद्र सरकारने देशातील सर्वात महत्त्वाची अंतर्गत गुप्तचर संस्था इंटेलिजन्स ब्युरोच्या संचालकपदी वरिष्ठ आयपीएस अधिकारी डॉ. महेश दीक्षित यांची नियुक्ती केली आहे. आंध्र प्रदेश केडरच्या १९९३ बॅचचे अधिकारी असलेले दीक्षित यापूर्वी आयबीमध्ये विशेष संचालक म्हणून कार्यरत होते. ते २०२२ पासून आयबीचे नेतृत्व करणारे तपन कुमार डेका यांची जागी येणार आहेत. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या अध्यक्षतेखालील मंत्रिमंडळाच्या नियुक्ती समितीने डॉ. महेश दीक्षित यांच्या नियुक्तीला मंजुरी दिली आहे. सरकारच्या आदेशानुसार, त्यांचा कार्यकाळ पदभार स्वीकारल्यापासून दोन वर्षांचा किंवा पुढील आदेश येईपर्यंत, यापैकी जे आधी असेल तोपर्यंत राहणार आहे. डॉ. महेश दीक्षित हे देशातील सर्वात अनुभवी गुप्तचर अधिकाऱ्यांपैकी एक मानले जातात.

ऑगस्ट २०१९ मध्ये जम्मू-काश्मीरमधील कलम ३७० हटवण्याच्या निर्णयापूर्वी सुरक्षेच्या दृष्टीने परिस्थितीचे मूल्यांकन करण्यात त्यांनी महत्त्वाची भूमिका बजावली होती. तसेच संक्रमण काळात कायदा-सुव्यवस्था राखण्यासाठी आवश्यक रणनीती (Strategy) तयार करण्यातही त्यांचा मोठा वाटा होता.

**काश्मीरमध्ये सांभाळल्या महत्त्वाच्या जबाबदाऱ्या**

जम्मू-काश्मीरचे पुनर्गठन होऊन जम्मू-काश्मीर आणि लडाख हे दोन केंद्रशासित प्रदेश निर्माण झाल्यानंतर दीक्षित यांच्यावर महत्त्वाच्या गुप्तचर जबाबदाऱ्या सोपवण्यात आल्या. या काळात त्यांनी जनतेचा विश्वास वाढवण्यासाठी आणि दहशतवाद तसेच फुटीरतावादी कारवायांमुळे निर्माण झालेल्या सुरक्षा आव्हानांचा प्रभावीपणे सामना करण्यासाठी महत्त्वाची भूमिका बजावली.

**जी-२० (G20) परिषदेतही महत्त्वाचे योगदान**

२०२३ मध्ये श्रीनगर येथे झालेल्या जी-२० (G20) पर्यटन कार्यगटाच्या बैठकीचे यशस्वी आयोजन करण्यातही डॉ. महेश दीक्षित यांनी महत्त्वाची भूमिका बजावली. या परिषदेदरम्यान अनेक परदेशी राजनैतिक शिष्टमंडळांनी काश्मीरला भेट दिली. बदलत्या सुरक्षा परिस्थितीचे अचूक मूल्यांकन आणि विविध यंत्रणांमधील समन्वय (Coordination) साधण्यात त्यांचे योगदान महत्त्वाचे मानले जाते.

**मोठ्या सुरक्षा आव्हानांच्या काळात नियुक्ती**

डॉ. महेश दीक्षित यांची नियुक्ती अशा वेळी झाली आहे, जेव्हा भारतासमोर दहशतवाद, कट्टरतावाद, सायबर धोके आणि सीमापार अपप्रचार मोहिमा यांसारखी मोठी सुरक्षा आव्हाने आहेत. नव्या आयबी (IB) प्रमुख म्हणून त्यांच्याकडून अंतर्गत सुरक्षा अधिक मजबूत करण्यासह विविध सुरक्षा आणि गुप्तचर संस्थांमधील समन्वय वाढवण्याची अपेक्षा व्यक्त केली जात आहे.

# एचजी फाउंडेशनच्या सीएसआर उपक्रमातून पोतुळमध्ये ज्येष्ठांना मोफत चप्पल व काठीचे वाटप

## संवेदना डेव्हलपमेंट सोसायटीच्या सहकार्याने सामाजिक बांधिलकीचा उपक्रम; वयोवृद्धांना दिला आधार

हिंदू प्रकाशवार्ता : प्रतिनिधी




**पोतुळ (ता. गंगापूर) :** एचजी फाउंडेशन आणि संवेदना डेव्हलपमेंट सोसायटी यांच्या संयुक्त विद्यमाने एचजी इन्फ्रा लिमिटेडच्या कॉर्पोरेट सोशल रिस्पॉन्सिबिलिटी (सीएसआर) उपक्रमांतर्गत पोतुळ गावातील ज्येष्ठ नागरिकांना मोफत चप्पल व चालण्यासाठी काठीचे वाटप करण्यात आले. ग्रामीण भागातील वयोवृद्धांना दैनंदिन जीवन अधिक सुरक्षित व सुलभ व्हावे, या उद्देशाने हा सामाजिक उपक्रम राबविण्यात आला.

कार्यक्रमात अनेक गरजू ज्येष्ठ नागरिकांना दर्जेदार चप्पल आणि मजबूत काठ्यांचे वितरण करण्यात आले. या मदतीमुळे लाभार्थ्यांनी समाधान व्यक्त करत आयोजकांचे आभार मानले.

उपक्रमाच्या यशस्वी आयोजनासाठी एचजी इन्फ्रा लिमिटेडचे सुरक्षा अधिकारी वीरेंद्र सर व श्री. शुभम यांचे मार्गदर्शन लाभले. संवेदना डेव्हलपमेंट सोसायटीचे मॅनेजर हरीश लालकोट, प्रकल्प समन्वयक सचिन लिमकर, सचिन दहाळे, इरशाद सय्यद, प्रथमेश हिवाळे, वर्षा कापसे आणि देवयानी कापसे यांनी नियोजन व अंमलबजावणीत विशेष परिश्रम घेतले.

कार्यक्रमाला शाळा व्यवस्थापन समितीचे अध्यक्ष लखन कापसे, सरपंच दादाभाऊ कापसे, प्रकाश कापसे, अरुण कापसे, गोपीनाथ घोडके, संजय कापसे, प्रशांत प्रकाळे, योगेश कापसे, बाळू दादा, दत्तू कापसे, पांडुरंग आव्हाड, निवृत्ती कापसे, विजय कापसे यांच्यासह अंगणवाडी सेविका, मदतनीस, पालक आणि ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# पावसाळ्यात सुरु असलेल्या कामामुळे अपघाताची मोठी भीती; नियोजनाशून्य कारभारामुळे नागरिकांमधून तीव्र संताप

हिंदू प्रकाशवार्ता | नितीन दांडगे

**छत्रपती संभाजीनगर :** शहरातील जटवाडा रोड परिसरात महानगरपालिकेने नियुक्त केलेल्या जीवीपीआर आणि अंकिता एजन्सी यांच्या वतीने जलवाहिनी व ड्रेनेस, चेंबर चे काम सुरू करण्यात आले आहे. मात्र, ऐन पावसाळ्यात सुरू असलेल्या या कामामुळे स्थानिक नागरिक आणि वाहनधारकांना प्रचंड त्रासाला सामोरे जावे लागत आहे. गेल्या चार दिवसांपासून हे काम सातत्याने सुरू असून, मनपाच्या नियोजनशून्य कारभारामुळे जनतेच्या पैशांची कशी उधळपट्टी होते, याचे थेट चित्र येथे पाहायला मिळत आहे.

सध्या पावसाळ्याचे दिवस असल्याने सतत पडणाऱ्या पाण्यामुळे खोदलेल्या चरांमध्ये मोठ्या प्रमाणावर चिखल आणि पाणी साचले आहे. रस्त्याच्या कडेला मातीचे मोठे ढीग साचल्याने जटवाडा रोडवरील रहदारीला प्रचंड अडथळा निर्माण होत आहे. पावसाळ्यात अशी कामे काढणे म्हणजे नागरिकांसाठी एक प्रकारे मोठा मानसिक आणि शारीरिक त्रास ठरत आहे. निसरड्या रस्त्यामुळे दुचाकी घसरून अपघात होत आहेत.

खड्ड्यांभोवती कोणतीही संरक्षक यंत्रणा किंवा बॅरिकेड्स लावलेले नसल्याने, रात्रीच्या वेळी एखादी मोठी दुर्घटना होऊन जीवितहानी होण्याची शक्यता नाकारता येत नाही. यात काही हानी झाल्यास त्याला मनपा जबाबदार राहणार की संबंधित एजन्सी? असा प्रश्न उपस्थित केला जात आहे. "एकीकडे सुशोभीकरणाच्या गप्पा मारायच्या आणि दुसरीकडे चांगला रस्ता तोडून चिखलाचे साम्राज्य निर्माण करायचे, हा मनपाचा अजब कारभार थांबला पाहिजे," अशी संतप्त प्रतिक्रिया स्थानिक रहिवाशांनी दिली आहे. या ठिकाणी तातडीने सुरक्षा उपाययोजना कराव्यात, तसेच उखडलेला रस्ता तात्काळ दुरुस्त करून द्यावा; अन्यथा मनपा आणि GVPR एजन्सीविरोधात तीव्र आंदोलन छेडण्यात येईल, असा इशारा नागरिकांनी दिला आहे.



### लाखोंचा खर्च पाण्यात; तयार सिमेंट रस्ता आणि पेव्हर ब्लॉक उखडले!

**अतिशय संतापजनक बाब म्हणजे, या भागात काही दिवसांपूर्वीच सिमेंटचा उत्तम रस्ता तयार करण्यात आला होता आणि रोडच्या बाजूला लाखो रुपये खर्च करून पेव्हर ब्लॉक बसवण्याचे काम पूर्ण झाले होते. मात्र, जलवाहिनी टाकण्यासाठी हे पूर्ण झालेले काम आता जेबीसीच्या साहाय्याने पूर्णपणे उखडून टाकण्यात आले आहे. रस्ता बनवण्यापूर्वी जलवाहिनीचे नियोजन का केले गेले नाही? आधी रस्ता बनवून त्यावर लोकांचा पैसा खर्च करायचा आणि नंतर पाईपलाईनसाठी तो तोडायचा, हा कुठला कारभार? यामुळे नागरिकांच्या करातून गोळा झालेल्या पैशांचा हा सरळ-सरळ अपव्यय आणि भ्रष्टाचाराला खतपाणी घालणारा प्रकार असल्याची भावना परिसरातून व्यक्त होत आहे.**

### समन्वयाचा अभाव; जनतेला वेठीस धरु नका!

**महानगरपालिकेचे विविध विभाग आणि कंत्राटदार एजन्सी यांच्यात कोणताही मेळ नसल्याचे यावरून स्पष्ट होते. उन्हाळ्यात संपूर्ण वेळ असताना कामे न करता, नेमका पावसाळा सुरू झाल्यावरच प्रशासनाला जाग का येते? काम पूर्ण झालेल्या भागात पुन्हा रस्त्याची दुरवस्था झाल्यामुळे स्थानिक व्यापाऱ्यांचे आणि रहिवाशांचे अतोनात नुकसान होत आहे.**

# सं पा द की य

## जागतिक स्तरावर भारतीय ज्युनियर नेमबाजांची ऐतिहासिक कामगिरी

जर्मनीतील सुहल येथे पार पडलेल्या आंतरराष्ट्रीय ज्युनियर विश्व अजिंक्यपद स्पर्धेत भारतीय युवा नेमबाजांनी अभूतपूर्व आणि देदिप्यमान कामगिरी करत जागतिक स्तरावर देशाची मान अभिमानाने उंचावली आहे. या अत्यंत प्रतिष्ठेच्या स्पर्धेत भारतीय संघाने एकूण चोवीस पदके जिंकून पदक तालिकेत अव्वल स्थान पटकावण्याचा ऐतिहासिक पराक्रम केला आहे. भारतीय रायफल असोसिएशनने या महाविजयाची अधिकृत घोषणा केली असून, या यशामुळे भारतीय क्रीडा क्षेत्रात आनंदाचे आणि उत्साहाचे वातावरण निर्माण झाले आहे. सलग दोनदा या जागतिक स्पर्धेत अव्वल स्थान राखणे ही अत्यंत अभिमानास्पद बाब असून, भारतीय नेमबाजीचा पाया किती मजबूत आहे, हेच या युवा खेळाडूंनी जगाला दाखवून दिले आहे. या जागतिक स्पर्धेच्या सुरुवातीपासूनच भारतीय खेळाडूंनी आपले निर्विवाद वर्चस्व गाजवायला सुरुवात केली होती. महिलांच्या दहा मीटर एअर पिस्तूल ज्युनियर गटामध्ये सेजल कांबळेने अचूक निशाना साधत वैयक्तिक सुवर्णपदक आपल्या नावावर केले, तर याच गटात हिमांशीने कांस्यपदकाची कमाई करत दुहेरी आनंद मिळवून दिला. भारताच्या महिला संघाने केवळ वैयक्तिक नव्हे, तर सांघिक गटातही आपली ताकद दाखवली. सेजल कांबळे, वंशिका चौधरी आणि नव्या बिश्नोई यांच्या त्रिकुटाने याच प्रकारच्या सांघिक गटात सुवर्णपदकावर आपले नाव कोरले. दबाव आणि आव्हानात्मक परिस्थितीमध्येही अत्यंत शांत चित्ताने आणि आत्मविश्वासाने भारतीय खेळाडूंनी लावलेला हा निशाणा कौतुकास्पद आहे. पुरुषांच्या गटामध्येही भारतीय नेमबाजांनी सुवर्णपदकांचा पाऊस पाडला. पंचवीस मीटर रॅपिड फायर पिस्तूल प्रकारात समीरने, तर पन्नास मीटर रायफल थ्री पोझिशनमध्ये रोहित कन्याण याने सुवर्णवेध घेतला. यासोबतच दहा मीटर एअर रायफल प्रकारात प्रितम केंद्रे आणि पंचवीस मीटर स्टँडर्ड पिस्तूल प्रकारात अभिनव देशवाल यांनी सुवर्णपदक जिंकून भारताचे स्थान अधिक बळकट केले. मिश्र सांघिक गटामध्ये शंभवी श्रवण क्षीरसागर आणि अभिनव शॉ यांनी दहा मीटर एअर रायफल प्रकारात सुवर्णपदक पटकावले. या खेळाडूंनी दाखवलेले कौशल्य आणि जिद्द ही भविष्यातील ऑलिम्पिक पदकांचे संकेत देणारी आहे, यात शंका नाही. या सुवर्णपदकांव्यतिरिक्त इतरही अनेक खेळाडूंनी वैयक्तिक गटात चमकदार कामगिरी करत पदकांची संख्या वाढवली. प्राची गायकवाड, शिवा नरवाल, शौर्य दिलीप भरणे आणि ऐश्वर्या रवीचंद्र बालेहसूर यांनी अत्यंत चुरशीच्या लढतीत रौप्यपदके पटकावली. तसेच अन्वी राठोड, युग प्रताप सिंग राठोड, रिया दुग्गल आणि राज चंद्रा यांनी कांस्यपदके जिंकून भारताच्या या ऐतिहासिक विजयात आपले मोलाचे योगदान दिले. तळागाळातील प्रशिक्षण कार्यक्रम, योग्य सुविधा आणि खेळाडूंची कठोर मेहनत यामुळेच हे यश शक्य झाले असून, भविष्यातील भारतीय नेमबाजीसाठी हा विजय अत्यंत आशादायक आणि मैलाचा दगड ठरणारा आहे.

# आजच्या युवकांच्या अभ्यासात पालकांची भूमिका



प्रा. नवनाथ बी. बांगर
(Blue Valley English School, Bidkin)

आज असं दिसत आहे की पालकांना आपल्या पाल्याना किंवा त्यांच्या अभ्यासाकडे लक्ष देण्यासाठी पुरेसा वेळ नाही. किंवा काम, नोकरी, व्यवसाय यामुळे ही मुलांकडे लक्ष देणे पालकांना शक्य नाही आपल्या मुलांची शैक्षणिक गुणवत्ता, अभ्यास, घरचं वातावरण, दिवसेंदिवस त्यांच्या कडून होणारा अति मोबाईलचा वापर, त्यांच्या मित्र संगतीतला वावर, त्यांची अभ्यास प्रगती, मागील शैक्षणिक वर्षातली गुण्णाची सूज, शाळेत आणि क्लासेस मधील त्यांची उपस्थिती, नियमित पणे होणाऱ्या घटक चाचणीतील मिळणारे गुण.. ई.. आदी बाबींचा सूक्ष्म विचार केल्यानंतर त्यांच्या कडून गुण्णांची तसेंच गुणवंत्तेची अवास्तव अपेक्षा धरू नये.बालविकास हा विविध घटकांनी आकार घेतलेला एक सततचा प्रवास आहे ज्यामध्ये पालकांचा सहभाग सर्वात शक्तिशाली राहतो. घर हे मुलाचे पहिले शिक्षण वातावरण असते आणि पालक हे त्याचे पहिले शिक्षक असतात. भावनिक संगोपनापासून ते शैक्षणिक प्रेरणापर्यंत, मुलांच्या विकासात पालकांचा सहभाग मुलाच्या व्यक्तिमत्त्वाचा, वर्तनाचा आणि संज्ञानात्मक क्षमतांचा पाया रचतो.पालक अनेक भूमिका बजावतात, जसे की ते काळजीवाहक, आदर्श, शिक्षक आणि भावनिक आधारस्तंभ. ते सुरक्षित आणि उत्तेजक वातावरण तयार करून दिनचर्या स्थापित करण्यास, शिस्त लावण्यास आणि शिक्षणाला पाठिंबा देण्यास मदत करतात. त्यांचे दृष्टिकोन, मूल्ये आणि वर्तन मुले जग कसे पाहतात आणि त्यात त्यांचे स्थान कसे पाहतात यावर प्रभाव पाडतात.

जेव्हा पालक त्यांच्या मुलांशी सक्रियपणे संवाद साधतात तेव्हा ते केवळ देखरेखीपेक्षा जास्त काही देतात; ते भावनिक सुरक्षितता, विकासात्मक उत्तेजन आणि संज्ञानात्मक विकासासाठी समर्थन देतात. या सहभागामुळे मुलाचा आत्मविश्वास, स्वातंत्र्य आणि सामाजिक कौशल्ये वाढण्यास मदत होते.शैक्षणिक यश आणि पालकांचा सहभाग यांचा जवळचा संबंध आहे. जेव्हा पालक त्यांच्या मुलाच्या शिक्षणात रस दाखवतात - पालक-शिक्षक बैठकींना उपस्थित राहून, गृहपाठात मदत करून किंवा वाचनाला प्रोत्साहन देऊन - तेव्हा ते स्पष्ट संदेश देतात की शिकणे महत्त्वाचे आहे. संशोधनातून असे दिसून येते की ज्या मुलांचे पालक त्यांच्या शालेय शिक्षणात सहभागी असतात त्यांची शैक्षणिक कामगिरी चांगली असते, त्यांची उपस्थिती चांगली असते आणि शिक्षणाकडे अधिक सकारात्मक दृष्टिकोन असतो. प्राथमिक ते माध्यमिक शाळेतील संक्रमणासारख्या आव्हानात्मक शैक्षणिक टप्प्यांमध्ये हे समर्थन विशेषतः महत्त्वाचे ठरते.

महत्त्वाचे म्हणजे, संख्येपेक्षा सहभागाची गुणवत्ता जास्त महत्त्वाची आहे. भावनिकदृष्ट्या उपलब्ध असणे, मुलाच्या चिंता ऐकणे आणि प्रयत्नांची प्रशंसा करणे ही शैक्षणिक सहभागाला प्रोत्साहन देण्यासाठी शक्तिशाली साधने आहेत. शैक्षणिक यशाव्यतिरिक्त, पालक आणि मुलांचा सामाजिक विकास यांचा जवळचा संबंध आहे. मुले पालकांशी सुरुवातीच्या संवादातून संवाद कसा साधावा, संघर्ष कसे सोडवायचे आणि सहानुभूती कशी दाखवायची हे शिकतात. हे सामाजिक वर्तन नंतर समवयस्क, शिक्षक आणि समाजातील इतरांशी संवाद साधण्यात आणले जाते.

जेव्हा पालक आदरयुक्त संवाद, सहकार्य आणि दयाळूपणाचे मॉडेल बनवतात, तेव्हा मुले त्यांच्या नातेसंबंधांमध्ये या वर्तनांचे प्रतिबिंब पाडतात.आपल्या पाल्याची बौद्धिक क्षमता, त्याची अभ्यास आवड, आपण त्याच्या प्रगतीसाठी देतं असलेलं रचनात्मक बळ, वेळोवेळी शिक्षक आणि मार्गदर्शकाकडून आलेल्या सूचना, आपलं मुलांसोबत असलेली अभ्यास प्रगती संदर्भातली वागणूक, आपण केलेलं फाजील लाड, आपल्या आशा आणि अपेक्षा ह्या सर्वं बाबतीतली आपली संवेदनशील दक्ष भूमिकेचं कस लावणारी आहे. शिवाय, ज्या मुलांना घरातील वातावरण स्थिर आणि भावनिकदृष्ट्या सुरक्षित असते ते मैत्री निर्माण करण्यास आणि सामाजिक वातावरणात भावनांचे व्यवस्थापन करण्यास अधिक सुसज्ज असतात. आठवड्यातून किमान दोनदा, आपणास जसं शक्य होईल तसं आपल्या मुलांशी Quality Time काढुन Healthy संवाद साधून मनमोकळ्या पद्धतीनं बोलतांना, त्यांचा दिनक्रम, शाळा-क्लास मधील चर्चा, तिथं घेण्यात आलेल्या उपक्रमातील सहभाग, त्यांचे मित्र-मैत्रीणी, त्यांचा स्वभाव-संवाद, आवडते-नावडते शिक्षक, त्यांची शिकवणी, आवडणाऱ्या गोष्टी, मित्र कसे आहेत, कोण कुठं कुठं राहतो आणि त्याचे वडील काय करतात,आवडणारे विषय, नं आवडणाऱ्या विषयातील त्यांच्या प्रत्यक्ष व अप्रत्यक्ष अडचणी, समस्या, आऊटडोर गेम्ससाठी किती वेळ देता, त्यांच्या शारीरिक समस्या व किरकोळ आजार, आपल्या मुलांच्या सामाजिक विकासातील स्व-स्वभाव गुण आणि दोष यांची माहिती, आपण केलेलं मुक्त मार्गदर्शन,त्यांच्याशी खेळणे,कौटुंबिक पार्श्वभूमि,आपल्या परिस्थितीचीहीं जाणीव आपल्या मुलांना आपल्या योग्य आचरणातूनचं करुन देतांना त्यांच्याशी होणारा आपला भावनिक संवाद ई.. आदी बाबींचा होणारा संवाद आज घरोघरी पालकांच्या व्यस्ततेनें हरवत चाललंय. विद्यार्थ्याच्या शैक्षणिक जीवनात पालकांचा सहभाग विद्यार्थ्याच्या कामगिरीत सुधारणा करतो. शालेय अभ्यासात मदत करणे, अभ्यासेतर उपक्रमांमध्ये सहभागी होणे आणि शिक्षकांशी बोलणे ही सर्व वर्गात सहभागी होण्याच्या पद्धतींची उदाहरणे आहेत. जे पालक आपल्या मुलांच्या शिक्षणात सक्रियपणे रस घेतात, त्यांच्यामुळे शैक्षणिक कामगिरीत सुधारणा, शाळेतील उपस्थितीत वाढ आणि प्रगत अभ्यासक्रमांमध्ये सहभाग वाढल्याचे दिसून आले आहे. पालकांच्या वाढलेल्या सहभागामुळे मुलांमध्ये शाळेबद्दलचा दृष्टिकोन सुधारतो आणि शैक्षणिक प्रेरणा वाढते, असे दिसून आले आहे. सामाजिक-आर्थिक किंवा कौटुंबिक समस्यांमुळे विद्यार्थ्याच्या शैक्षणिक कामगिरीत अडथळा येऊ शकतो, तरीही पालकांचा सहभाग या प्रभावांविरुद्ध एक संरक्षक कवच म्हणून काम करू शकतो. पालकांना त्यांच्या मुलाच्या शिक्षणात सहभागी करून घेण्यासाठी आणि मदत करण्यासाठी केलेल्या प्रयत्नांचा विद्यार्थ्याच्या शैक्षणिक आणि वैयक्तिक विकासावर दीर्घकाळ टिकणारा, फायदेशीर परिणाम होऊ शकतो आणि विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक निकालांमध्ये पालकांचा सहभाग महत्त्वपूर्ण भूमिका बजावतो.

पालकांचे मार्गदर्शन मुलांना समवयस्कांचा दबाव, गुंडगिरी आणि सोशल मीडियाच्या आव्हानांना तोंड देण्यास मदत करते. पालक आणि मुलांमधील मुक्त संवाद आणि विश्वास मुलांना निरोगी सामाजिक निवडी करण्यास आणि गरज पडल्यास मदत घेण्यास सक्षम करतो. मुलांशी मैत्रीपूर्ण संवाद साधणे, त्यांचे ऐकून घेणे आणि त्यांना समजून घेणे हा चांगल्या पालकत्वाचा पाया आहे.मुलांना ओरडण्याऐवजी किंवा शिक्षा करण्याऐवजी, त्यांना काय योग्य आणि अयोग्य आहे, हे समजावून सांगणे महत्त्वाचे आहे. आजच्या डिजिटल युगात मुलांना तंत्रज्ञानापासून दूर ठेवणे आणि त्यांच्यासोबत दर्जेदार वेळ (Quality Time) घालवणे हे मोठे आव्हान आहे. मुलांशी तुलना न करता, त्यांच्यातील सुप्त गुणांना वाव देणे म्हणजे खरे पालकत्व. ज्या घरात आपुलकी, सहकार्य आणि सकारात्मक संवाद असतो, तिथे मुले आत्मविश्वासू, आनंदी आणि समजूतदार बनतात.

आई-वडिलांकडून मिळणारे भावनिक सुरक्षिततेचे भान मुलांना त्यांच्या भावना मोकळेपणाने व्यक्त करायला शिकवते. ताणतणावग्रस्त किंवा भांडणारे वातावरण -

सतत वाद, ओरड, राग, दुर्लक्ष असलेले वातावरण मुलांमध्ये असुरक्षितता, भीती आणि राग निर्माण करते.अशी मुले आक्रमक, चिडचिडी किंवा अंतर्मुख होऊ शकतात. पालकांच्या वागणुकीचे अनुकरण -मुले पालकांकडून भावना हाताळण्याचे कौशल्य शिकतात.जर पालक शांततेने समस्या सोडवतात, तर मूलही तसाच दृष्टिकोन ठेवते.

उलट, जर पालक भावनांवर नियंत्रण ठेवू शकत नाहीत, तर मूलही भावनिक अस्थिर होऊ शकते. मागील परीक्षेत आणि हाती आलेल्या घटक चाचण्या आणि सराव परीक्षाच्या निकालावरून गुणांच्या तुलनेवरून त्यांची गुणवंत्ता मोजण्याची घाई करू नये. कारण मुलांची सर्वोतोपरी गुणवंत्ता मोजण्याची कोणतीचं 'फूटपट्टी' अजूनही तयार झालेली नाहीये..

ईतर मुलांच्या गुणांच्या बरोबरीत आपल्या मुलांची तुलना नक्कोच.. कारण " पाच बोट्टे सारखी नसतातचं..!"आपल्या मुलांच्या 'हुशारीचं कौतुक' अवश्य करावं पण इतरांशी तुलना करुन आपलं 'हुशारीपण' मिरवू नये, तत्पूर्वी आपली भूतकालीन शालेय स्व:शैक्षणिक गुणहीं तपासावेत. पालक-शिक्षक-विद्यार्थी यांचा उत्तम संवाद , स्नेह-सहकार्यातूनचं विद्यार्थ्यांच्या अनेक प्रश्नांवर मात करुन त्यांची शैक्षणिक प्रगती साधली तरच मुलं शिक्षणाच्या मुख्य प्रवाहात येऊन आपलं शैक्षणिक-सामाजिक विकास करू शकतात असं मला वाटतं. पालकत्वाची शैली मुलांच्या मानसिक आरोग्यावर सकारात्मक आणि नकारात्मक अशा दोन्ही प्रकारे प्रभाव टाकू शकते. कठोर किंवा दुर्लक्ष करणाऱ्या पालकत्व पद्धतींमुळे मुलांमध्ये चिंता, नैराश्य, राग आणि वर्तणुकीशी संबंधित इतर समस्या वाढण्याची शक्यता असते. याउलट, अधिकारयुक्त पालकत्वामुळे मुलांचे मानसिक आरोग्य सुधारते आणि त्यांचा आत्मविश्वास वाढतो.मुलाच्या जीवनात, वाढीत आणि विकासात पालकत्व हा एक अत्यंत आवश्यक पैलू आहे. पालकत्व मुलांच्या भविष्यातील वाटचालीची दिशा ठरवते. त्यामुळे, मुलांचे संगोपन कसे झाले यावर अवलंबून, ते भविष्यात आपली जीवनशैली स्वीकारतील. मुलांची वृत्ती आणि वर्तन थेट पालकांकडूनच येते. खरे तर, अलीकडील संशोधनांनी हे सिद्ध केले आहे की, पालकांच्या वृत्तीचा मुलाच्या विकासाच्या सुरुवातीच्या टप्प्यात त्याच्या मेंदूवर प्रतिकूल परिणाम होतो. पालकांच्या सकारात्मक आणि नकारात्मक सवयींचा थेट संबंध मुलाच्या मानसिक स्थिरतेशी आणि आरोग्याशी असतो.

मुलाच्या सकारात्मक विकासासाठी, सकारात्मक पालकत्व महत्त्वपूर्ण भूमिका बजावते. पोषक आणि निरोगी वातावरण मुलांच्या वृत्तीवर आणि परिणामी त्यांच्या निरोगी वाढीवर सकारात्मक प्रभाव टाकते. याउलट, नकारात्मक पालकत्व मुलाचे आरोग्य बिघडवते. खरे तर, असे मानले जाते की, प्रतिकूल पर्यावरणीय परिस्थितीमुळे मुलाला गंभीर मानसिक आघात होतो, ज्यामुळे नकारात्मक आणि अयोग्य पालकत्वामुळे मुलाची वाढ खुंटू शकते. याचा परिणाम म्हणून अनेक समस्या निर्माण होतात, ज्या मुलांच्या भविष्यातील जीवनावर परिणाम करतात

**निष्कर्ष :**

मुलांच्या विकासात पालकांचा सहभाग हा मुलाच्या भविष्यातील सर्वात महत्वाच्या गुंतवणुकींपैकी एक आहे. बालपणापासून ते पौगंडावस्थेपर्यंत, पालकांचा सातत्यपूर्ण पाठिंबा बौद्धिक, भावनिक आणि सामाजिक विकासाचा पाया रचतो. त्यांच्या खोलवरच्या प्रभावाची ओळख करून, पालक असे संगोपन करणारे वातावरण तयार करू शकतात जे त्यांच्या मुलांना जीवनाच्या प्रत्येक पैलूत भरभराटीसाठी सक्षम बनवते.पालकांनी आपल्या पालकत्वाच्या जबाबदाऱ्या टाळणे थांबवून आपल्या मुलांच्या कृतींची जबाबदारी घेतली पाहिजे. सकारात्मक वर्तनाची सुरुवात स्वतः पालकांपासूनच झाली पाहिजे. त्यामुळे, त्यांनी आपल्या मुलांसाठी एक सकारात्मक आदर्श असले पाहिजे. पालकांनी हे लक्षात घेतले पाहिजे की नकारात्मक पालकत्वामुळे मुले त्यांच्याशी भीतीपोटी वागतात. याव्यतिरिक्त, पालकांची सकारात्मक प्रतिमा मुलांमध्ये त्यांना खूश करण्याची इच्छा निर्माण करते, ज्यामुळे त्यांचे वर्तन सकारात्मक राहते. ■

### श्री स्वामी समर्थ ग्रामीण बिगरशेती सहकारी पतसंस्था मर्यादीत आमखेडा ता.सोयगाव 23 वी वार्षिक सर्वसाधारण सभा उत्साहात संपन्न

# पतसंस्थेची मोठी वाटचाल सोयगाव तालुक्यात नविन शाखा ओपन करा - तेजस्विनी काळे

हिंदू प्रकाशवार्ता/ प्रतिनिधी

**सोयगाव,दि.२६ जून :** श्री स्वामी समर्थ ग्रामीण बिगरशेती सहकारी पतसंस्था मर्यादीत आमखेडा ता.सोयगाव २३ वार्षिक सर्वसाधारण सभा अमृतबाग हॉटेल येथे दि.२६ शुक्रवार रोजी १०.३० वाजता सुरुवात करण्यात आली.यावेळी दिप प्रज्वलन करून व श्री स्वामी समर्थ प्रतिमा पूजन करून सभेला सुरुवात करण्यात आली.सभेसाठी प्रमुख पाहुणे म्हणून लाभलेले गोंदिया येथील जिल्हा आरोग्य अधिकारी डॉ.अभिजीत गोल्हार यांची विशेष उपस्थिती होती.तर बँक ऑफ महाराष्ट्र शाखा सोयगावचे मॅनेजर धीरज भुरे, तेजस्विनी काळे,डॉ.मलहान पटेल,आमखेडा ग्रामपंचायत प्रशासक नंदा आगे,आमखेडा माजी सरपंच गजानन ढगे, शिवसेना सोयगाव तालुका प्रमुख दिलीप मचे(ठाकरे गट), निंबायती गावाचे सरपंच राजू पाटील,माजी सरपंच धनसिंग राठोड,कंकराळा सोसायटी माजी सभापती रवींद्र पाटील, गलवाडा माजी सरपंच सुरेखा तायडे,खरेदी विक्री संघाचे मॅनेजर बन्सीलाल बेडवाल,जिल्हा मध्यवर्ती बँकेचे रमेश जाधव,प्रदीप रोकडे,कै. बाबुरावजी काळे पतसंस्थेचे व्हा. चेअरमन योगेश बोखारे,कै. बाबुरावजी काळे पतसंस्थेचे

मॅनेजर सिताराम गोतमारे,भैरवनाथ पतसंस्था



मॅनेजर गोविंदा औरंगे,तिरुपती अर्बन बँकेचे मॅनेजर विकास देसाई, कृष्णा शेवाळकर,योगेश काळे,पतसंस्थेच्या संचालिका विमलबाई निकम,जरंडी मुख्याध्यापक देविदास पाटील, आमखेडा पोलीस पाटील अंबादास ढगे,पत्रकार मंडळी,आमखेडा ग्रामपंचायत सचिव कडुबा ठाकरे,सामाजिक कार्यकर्ते दत्तू रोकडे,बँक ऑफ महाराष्ट्र शाखेचे दत्ता गाडेकर,ग्रामीण बँक जरंडीचे ज्ञानेश्वर सुस्ते, मयुर

**श्री स्वामी समर्थ पतसंस्था ही सहकार तत्त्वावर चालणारी एक महत्त्वाची आर्थिक संस्था आहे.सर्वसामान्य नागरिकांना,सभासद व छोटे मोठे व्यापारी यांना आणि कर्मचाऱ्यांना सहज कर्ज उपलब्ध करून देणे आणि बचतीची सवय लावणे हा या संस्थांचा मुख्य उद्देश असतो. तर माझी पतसंस्थेचे अध्यक्ष व सर्व संचालक मंडळ यांना सोयगाव तालुक्यात अजून नविन शाखा ओपन करा असे कार्यक्रमाच्या ठिकाणी बोलताना सांगितले**

**- तेजस्विनी काळे**

मनगटे,संजय मोरे,बाबु शहा, संदिप सोहणी,अमृतबाग हॉटेलचे संचालक शुभम गिरी,आदींसह मान्यवर मंडळी तसेच संस्थेचे सभासद व खातेदार,संस्था अध्यक्ष अॅड.राजेश भैय्या गिरी,उपाध्यक्ष विष्णु दुसाने,संचालक सर्वश्री आकाश वरकड,युवराज आगे,एस. टी.पाटील,बाबु पटेल,सतिश कोलते,अर्जुन बोडखे,कदीर शहा,राहुल गोसावी,रवि अप्पा इंगळे,अमोल निकम व कर्मचारी ज्ञानेश्वर पाटील,सुनिल सैंदाने,देवा बैरागी,गणेश पवार, तर कार्यक्रमाचे प्रास्ताविक सतिश कोलते यांनी केले व आभार अध्यक्ष राजेश गिरी यांनी मानले यानंतर स्नेह भोजन कार्यक्रम पार पडला.

# अजिंठा येथे मोहर्रम विसर्जन शांततेत संपन्न; सवाऱ्यांची विसर्जन मिरवणूक पाहण्यासाठी अलोट गर्दी

हिंदू प्रकाश वार्ता प्रतिनिधी

**अजिंठा :** जगभर प्रसिद्ध असलेल्या अजिंठा येथे हिंदू-मुस्लीम ऐक्याचे प्रतीक असलेली , पारंपारिक मोहर्रमचा धार्मिक विसर्जन मिरवणूक शुक्रवारी (दि. २६ ) सायंकाळी शांततेत आणि उसाहपूर्ण वातावरणात पार पडला. मोहरम निमित्त काढण्यात आलेल्या सवाऱ्यांच्या मिरवणुकीने गावात भक्तिमय वातावरण निर्माण झाले होते .या मिरवणूक पाहण्यासाठी आणि विसर्जन मिरवणुकीत सहभागी होण्यासाठी अजिंठा परिसरात नागरिकांनी मोठ्या संख्येने गर्दी केली होती . मोहरमच्या पार्श्वभूमीवर गावात विसर्जन मिरवणुकीला शुक्रवारी सकाळी ८ वाजता बुऱ्हाख बिबी , ताजीयाँ सवाऱ्याची मिरवणूक ढोल ताशेच्या गरजेनेत हुसेनी मोहल्यातून काढण्यात आली . या हुसेन या हुसेनच्या जोरदार घोषणेने अजिंठा शहर दुमदुमले होते . मिरवूनक दरम्यान युवक, ज्येष्ठ नागरिक महिला तसेच लहान मुलांनी या मिरवणुकीत उत्स्फूर्त सहभागा नोंदवला .

मिरवणुक मार्गावर मोठा पोलीस बंदोबस्त तैनात करण्यात आले होते . दरवर्षी हा सण हिंदू-मुस्लिम बांधव एकत्र येऊन साजरा करतात.

इमाम वाड्यातून जोगी झाल्यानंतर शुक्रवारी सकाळी ( १०३० वाजेला इमाम हसन ,हुसेन, अली अबास (पंजा ) सवाऱ्याचे विसर्जन मिरवणुकीला प्रारंभ झाला .परिसरात ही सवारी खेळविण्यात आली होती .

या मिरवणूक पाहण्यासाठी शिवभा गेट परिसरात महिला व नागरिकांनी गर्दीने फुलून गेला होता .श्रद्धा शिस्त आणि उत्सव याचा सुंदर मिलाफ या मिरवणुकीत पाहायला मिळाला . मोहरमच्या धार्मिक परंपरेनुसार विसर्जन वेळी स्वारीवर फुलांची चादर तसेच नवस चढविण्यासाठी नागरिकांची धडपड चालली होती .काही ठिकाणी प्रसाद शरबत याचंही वाटप करण्यात आले. सवाऱ्याची दर्शनासाठी भाविकांची उडालेली झुंबड अशा वातावरणात मिरवणूक गांधी चौकाकडे मार्गस्थ झाले. दुपारी तीन वाजेच्या नंतर सर्व सवाऱ्या गावातील विविध ठिकणीच्या प्रमुख मार्गावरून सवाऱ्या पुढे सरकत असताना नागरिकांनी रस्याच्या दुतर्फा उभे राहुन दर्शन घेतले .



दरवर्षीप्रमाणे यावर्षीही बसविण्यात आलेल्या ६० सवाऱ्यां सर्व एकत्र येऊन गांधी चौकात ढोल ताशाच्या गर्जनात सवाऱ्याचा विसर्जन

बुऱ्हाख बिबी, ताजीयाँ, बडे नाल साहाब ,छोटे नालसाहाब, अली अब्बास, मौलाआली, नाले हैदर, अली अब्बास,बने कासम , चॉदसाहाब, गैबन शहावली, असे विविध ठिकाचे

बसविण्यात आलेल्या ६० सवाऱ्यां सर्व एकत्र येऊन गांधी चौकात ढोल ताशाच्या गर्जनात सवाऱ्या विसर्जनसाठी करबलीकडे मार्गस्थ झाल्याने. या हुसेन या हुसेन या गर्जनेने दाणून परिसर सोडला होता . मुस्लिम समाजाबरोबरच हिंदूचा सहभाग मिरवणुकीत मोठ्या प्रमाणात होता. ताजीयॉ हाऊस कुंडात विसर्जन करण्यात आले .तर

सर्व सवाऱ्या करबला जवळ परंपरेने संयकाळी ७ वाजता सवाऱ्याचे विसर्जन पारंपरिक विधीसह करण्यात आले .भाविकांनी प्रार्थना करून शांतता ,बंधू भावाचा संदेश दिला .यावेळी पंचक्रोशीतील हजारो भावीक सहभागी झाले होते .

मोहरम विसर्जन शांततेत पार पडावा यासाठी पोलीस प्रशासनाने जो बंदोबस्त ठेवला होता .या मिरवणूकी चा मार्ग संविधानशील ठिकाणे आणि विसर्जनस्थळी पोलिसांची विशेष नियुक्ती करण्यात आली होती .वाहतुकीची नियम ही योग्य पद्धतीने करण्यात आले होते .पोलीस प्रशासन ग्रामस्थ आणि आयोजक यांच्या समन्वयामुळे कोणताही अनुचित प्रकार न घडता विसर्जन मिरवणूक सुरळीत पार पडला . यावेळी उपविभागीय अधिकारी डॉ दिनेश कोल्हे यांच्या मार्गदर्शनाखाली सहाय्यक पोलीस निरीक्षक पवन इंगळे , विशेष शाखे चे सपोनी . आमोल ढाकणे.

उपनिरीक्षक रामेश्वर इंगळे , उपनिरिक्षक भवर , धम्मदीप काकडे ,हे कॉ. दिलीप तडवी, संतोष पाईकराव, पोलीस नाईक रामानंद बुधवंत , संदिप कोथलकर ,रवि बाघुल, बाबा चव्हाण, कृष्णा ठाकरे, वी आर पवार ,आदी पोलीस कर्मचारीसह होमगर्ड आदीनी चोख बदोबस्त ठेवला होता .धार्मिक सोहळ्या निमित्ताने अजिंठ्यात सामाजिक आणि बंधुभावचे दर्शन घडले .सर्व समाज घटकांनी एकोप्याने सहकार्याने परत मोहरम उत्सव शांततेत पार पाडला .आयोजकांनी तसेच स्थानिक नागरिकांनी कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी सहकार्य करणाऱ्या प्रशासन पोलीस यंत्रणा आणि समाज बांधवांचे आभार मानले .आज इंडियातील मोहरम विसर्जन सोहळा श्रद्धा परंपरा आणि सामाजिक सलोख्याचा संदेश देणारा ठरला .

# ड्रग्सविरोधात पोलिसांचा एल्गार; शहरभर व्यसनमुक्तीची जनजागृती

## जागतिक व्यसनमुक्ती दिनानिमित्त महाविद्यालये, व्यसनमुक्ती केंद्रांमध्ये अभियान

हिंदू प्रकाशवार्ता : प्रतिनिधी

**छत्रपती संभाजीनगर :** शहरातील युवकांना अमली पदार्थांच्या विळख्यातून दूर ठेवण्यासाठी आणि ड्रग्सविरोधात जनमत तयार करण्याच्या उद्देशाने जागतिक व्यसनमुक्ती दिनानिमित्त छत्रपती संभाजीनगर पोलीस आयुक्तालयाने शुक्रवारी शहरभर व्यापक जनजागृती मोहीम राबविली. महाविद्यालये, व्यसनमुक्ती केंद्रे आणि सार्वजनिक ठिकाणी मार्गदर्शन, पोस्टर प्रदर्शन, जनजागृतीपर पुस्तिकांचे वितरण आणि विशेष कार्यशाळांच्या माध्यमातून नागरिकांना व्यसनाचे दुष्परिणाम समजावून सांगण्यात आले.

पोलीस आयुक्त प्रवीण पवार यांच्या मार्गदर्शनाखाली अमली पदार्थ प्रतिबंध विभागाने मुक्ताई व्यसनमुक्ती केंद्र (उस्मानपुरा) आणि क्रांती चौक येथील ॲलन कोचिंग क्लासेसमध्ये विशेष जनजागृती कार्यक्रम घेतले. विद्यार्थी आणि नागरिकांना अमली पदार्थांचे शारीरिक, मानसिक व सामाजिक दुष्परिणाम समजावून सांगत व्यसनमुक्त जीवनाचा संदेश देण्यात आला.



सिडको पोलीस ठाण्याने एमजीएम महाविद्यालयात, तर सातारा पोलीस ठाण्याने एमआयटी महाविद्यालयात व्यसनमुक्ती विषयक मार्गदर्शन कार्यशाळा आयोजित केल्या. विद्यार्थ्यांनी या उपक्रमांना उत्स्फूर्त प्रतिसाद देत व्यसनमुक्त समाज घडविण्याचा संकल्प व्यक्त केला. दरम्यान, पोलीस उपआयुक्त (परिमंडळ-२) रत्नाकर नवले यांनी शहरातील आठ व्यसनमुक्ती केंद्रांच्या प्रतिनिधींसोबत बैठक घेऊन समन्वयाने जनजागृती आणि पुनर्वसनाचे काम अधिक प्रभावीपणे राबविण्याचे आवाहन केले. रायगड येथील सायकलपटू सुबोध गांगुर्डे यांनी देशभर सुरू असलेल्या आपल्या व्यसनमुक्ती जनजागृती मोहिमेअंतर्गत विविध कार्यक्रमांत सहभागी होत युवकांना व्यसनापासून दूर राहण्याचे आवाहन केले.

यावेळी पोलिसांनी स्पष्ट इशारा दिला की, शहरात अमली पदार्थांची विक्री, वाहतूक किंवा तस्करी करणाऱ्यांविरोधातील कठोर कारवाई यापुढेही अधिक तीव्र करण्यात येणार आहे. अशा प्रकारची माहिती नागरिकांनी निःसंकोचपणे पोलिसांना द्यावी. माहिती देणाऱ्याची ओळख पूर्णपणे गोपनीय ठेवली जाईल, असे आवाहनही करण्यात आले.

ही मोहीम पोलीस आयुक्त प्रवीण पवार, पोलीस उपआयुक्त (गुन्हे) प्रशांत मोहिते आणि पोलीस उपआयुक्त रत्नाकर नवले यांच्या मार्गदर्शनाखाली अमली पदार्थ प्रतिबंध विभाग तसेच सिडको व सातारा पोलीस ठाण्यांच्या अधिकारी-कर्मचाऱ्यांनी राबविली.

# सुरक्षित समाज आणि नशामुक्त भारत हेच आपले ध्येय : पोलीस उपअधीक्षक साईनाथ ठोंबरे

## अंमली पदार्थ विरोधी दिनानिमित्त जनजागृतीपर कार्यक्रम संपन्न

**छत्रपती संभाजीनगर, :** महाविद्यालयीन जीवनात मिळणाऱ्या स्वातंत्र्याचा योग्य वापर करत कोणत्याही प्रकारच्या अंमली पदार्थांच्या प्रलोभनांना ठामपणे 'नाही' म्हणायला शिका. एक व्यसनी व्यक्ती केवळ स्वतःचेच नव्हे तर आपल्या कुटुंबाचे आणि संपूर्ण समाजाचेही नुकसान करते. व्यसनमुक्त समाजाची उभारणी ही प्रत्येकाची सामूहिक जबाबदारी असून सुरक्षित समाज आणि नशामुक्त भारत हेच आपले ध्येय असल्याचे प्रतिपादन पोलीस उपअधीक्षक साईनाथ ठोंबरे यांनी केले.

महात्मा गांधी मिशन विद्यापीठाच्या राष्ट्रीय सेवा योजना (एनएसएस) आणि अंमली पदार्थ विरोधी टास्क फोर्स, छत्रपती संभाजीनगर कृती विभाग यांच्या संयुक्त विद्यमाने जागतिक अंमली पदार्थ विरोधी दिनानिमित्त विद्यापीठाच्या आर्यभट्ट सभागृहात जनजागृतीपर कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. यावेळी पोलीस उपअधीक्षक साईनाथ ठोंबरे यांनी विद्यार्थ्यांशी संवाद साधला.




या कार्यक्रमास एमजीएम विद्यापीठाचे कुलगुरू प्रा. डॉ. विलास सपकाळ, कुलसचिव डॉ.आशिष गाडेकर, राष्ट्रीय सेवा योजना समन्वयक डॉ.आर. आर.देशमुख, क्रीडा संचालक नितीन घोरपडे, पोलिस निरीक्षक गीता बागवडे, सचिन काळे, जगदाळे व दिपाली पाटील, पोलीस अधिकारी व कर्मचारी, प्राध्यापक, विद्यार्थी व सर्व संबंधित उपस्थित होते.

पुढे बोलताना पोलीस उपअधीक्षक साईनाथ ठोंबरे म्हणाले की, अंमली पदार्थांचा वापर आपणच थांबवला तर त्यांची साखळी आपोआप तुटेल. त्यामुळे प्रत्येकाने स्वतः व्यसनापासून दूर राहून आपल्या कुटुंबाला आणि समाजालाही त्यापासून दूर ठेवण्याची जबाबदारी स्वीकारली पाहिजे. जर कोणते व्यसन करायचेच असेल तर ते अभ्यासाचे, चांगले पुस्तक वाचण्याचे आणि नियमित व्यायामाचे करा. स्वतःच्या शारीरिक व मानसिक आरोग्यासाठी वेळ द्या. दृढ इच्छाशक्ती आणि योग्य दिशा असेल तर कोणत्याही व्यसनावर सहज मात करता येते.

आवड, सवय आणि व्यसन या प्रवासात विवेक, योग्य ज्ञान आणि आत्मनियंत्रण यांची भूमिका अत्यंत महत्त्वाची असते. चांगल्या सवयी अंगीकारल्यास व्यक्तिमत्त्वाचा सर्वांगीण विकास होतो. प्रत्येक विद्यार्थ्याने नियमित व्यायाम, एखादा खेळ आणि वाचनाची सवय लावून घेतली पाहिजे. सकारात्मक विचार, शिस्त आणि सातत्य यांच्या बळावरच यश, प्रतिष्ठा आणि सन्मान प्राप्त होतो. आपल्यातील क्षमता ओळखून त्यावर काम करणे आवश्यक असून चुकीच्या गोष्टींना ठाम विरोध करत नशामुक्त भारत घडविण्यासाठी प्रत्येकाने योगदान द्यावे, असे कुलगुरू प्रा. डॉ. विलास सपकाळ यांनी यावेळी सांगितले.

कार्यक्रमाच्या शेवटी सर्व उपस्थितांनी अंमली पदार्थ विरोधी सामूहिक शपथ घेत व्यसनमुक्त समाज निर्माण करण्याचा संकल्प केला. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन व आभार प्रदर्शन डॉ. आर. आर. देशमुख यांनी केले.

# विक्रीसाठी गांजा घेवून येत असताना दोघांना रंगेहाथ पकडले

हिंदू प्रकाशवार्ता/प्रतिनिधी

**सोयगाव,दि.२६ जून :** उंडणगाव ता.सिल्लोड येथून दुचाकीने हळदा मार्गाने विक्रीच्या उद्देशाने दोन किलो गांजा सोयगाव कडे घेवून येत असताना दोघांना वेताळवाडी शिवारात सोयगाव पोलीसांनी रंगेहाथ पकडले ही घटना गुरुवारी(दि.२५) सायंकाळी पाच वाजेच्या दरम्यान वेताळवाडी शिवारात घडली सोयगाव पोलीसांनी वेताळवाडी शिवारात डोंगराच्या पायथ्याशी दबा धरून बसत सापळा रचून ही कारवाई केली आहे.

सिल्लोड तालुक्यातील उंडणगाव येथून विक्रीच्या उद्देशाने मोटारसायकल वरून अजगर अली अन्सार अली शहा

(वय.४३ वर्ष रा.उंडणगाव ता.सिल्लोड )



पांडुरंग पुंडलिक केळोदे (वय.६५ वर्ष रा.उडणगाव ता. सिल्लोड) हे दोघेही एक किलो ९०० ग्राम गांजा घेवून मोटारसायकल ने सोयगाव कडे येत असताना सोयगाव पोलीसांनी वेताळवाडी शिवारात डोंगराच्या पायथ्याशी सापळा रचून या दोघांना रंगेहाथ पकडून त्यांचे कडून एक किलो नऊशे ग्रॅम गांजा एकूण किंमत ५७ हजार रु व मोटारसायकल एकूण किंमत पन्नास हजार रु असा एकूण एक लाख ७ हजाराचा मुद्देमाल हस्तगत करून सोयगाव पोलीस ठाण्यात रात्री उशिरा या दोघांविरुद्ध गुन्हा दाखल करून त्यांना अटक केली आहे.सोयगाव पोलीस स्टेशनचे सहाय्यक पोलीस निरीक्षक दिनकर गोरे यांच्यासह गजानन दांडगे,अजय कोळी,कुणाल जाधव,सादिक तडवी,शांताराम सपकाळ,यांच्या विशेष पथकाने ही कारवाई केली आहे दरम्यान घटनास्थळी रात्री उशिरा फॉरेन्सिक लॅब चे पथकाने धाव घेवून घटनेचा पंचनामा केला आहे.याप्रकरणी छत्रपती संभाजीनगर ग्रामीण पोलीस अधीक्षक प्रकाश जाधव,उपविभागीय पोलीस अधिकारी विश्वजित काईगडे यांच्या मार्गदर्शनाखाली सहाय्यक पोलीस निरीक्षक दिनकर गोरे,गजानन दांडगे,अजय कोळी,कुणाल जाधव, सादिक तडवी,शांताराम सपकाळ,आदी करत आहे

---गांजाचे सिल्लोड कनेक्शन

सोयगाव तालुक्यात सिल्लोड तालुक्यातून मोठ्या प्रमाणावर गांजा ची तस्करी होत आहे दरम्यान नव्याने रुजू झालेल्या सहाय्यक पोलीस निरीक्षक दिनकर गोरे यांनी सापळा रचून गुरुवारी यावर छापा घातल्यामुळे गांजा विक्रेत्यांची दाणादाण उडाली आहे.

# वटपौर्णिमेनिमित्त आऊसाहेब सेवा प्रतिष्ठानकडून वृक्षारोपण

हिंदू प्रकाशवार्ता : प्रतिनिधी

**छत्रपती संभाजीनगर :** वटपौर्णिमेनिमित्त आऊसाहेब सेवा प्रतिष्ठानच्या वतीने साई टेकडी येथे वृक्षारोपण करून पर्यावरण संवर्धनाचा संदेश देण्यात आला. यासोबतच महिलांसाठी विविध पारंपरिक व क्रीडा स्पर्धांचे आयोजन करण्यात आले. या उपक्रमाला महिलांचा उत्स्फूर्त प्रतिसाद लाभला.

कार्यक्रमाच्या प्रमुख पाहुण्या डॉ. दिव्या पाटील यांनी वटपौर्णिमेचे धार्मिक, सामाजिक आणि पर्यावरणीय महत्त्व विषद केले. वडाचे झाड दीर्घायुष्य, स्थैर्य आणि समृद्धीचे प्रतीक असून पर्यावरणाचा समतोल राखण्यासाठी प्रत्येकाने किमान एक झाड लावून त्याचे संगोपन करण्याचा संकल्प करावा, असे आवाहन त्यांनी यावेळी केले.




यावेळी उखाणे स्पर्धा, टिकली लावण्याची स्पर्धा, खो-खो आणि कबड्डी अशा विविध स्पर्धांचे आयोजन करण्यात आले. महिलांनी मोठ्या उत्साहाने सहभाग नोंदवत कार्यक्रमात रंगत आणली. स्पर्धेतील विजेत्यांचा आऊसाहेब सेवा प्रतिष्ठानच्या वतीने सन्मानचिन्ह व बक्षिसे देऊन गौरव करण्यात आला.

कार्यक्रमाच्या यशस्वी आयोजनासाठी सोनाली बोरसे, मनीषा खोत, खुशी शर्मा, माया नरोडे, जयश्री फंड, प्रीती काश्ते, संजीवनी थोरात, ज्योती पाटील, सविता ढाके, सुचिता ढाके, रमा कुठे, कविता जठार, सुनीता कोल, सुमित्रा गायकवाड, वनिता भोसले, तन्वी दांडगे आणि प्रिया ई. यांनी विशेष परिश्रम घेतले.

# आरक्षण देणारा पाहिला राजा छत्रपती शाहू महाराजांना अभिवादन



**खुलताबाद :** तालुक्यातील गल्ले बोरगाव येथील शिरसाट राजवाडा येथे डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांना परदेशात पडवणारे पहिले राजे तसेच आरक्षण देणारे पहले राजे राजेश्री छत्रपती शाहू महाराज यांच्या जयंती निमित्ताने पुष्प हार अर्पण करून त्रिवार अभिवादन करण्यात आले. याबाबत सविस्तर माहिती अशी कि. आज छत्रपती शाहू महाराज जयंती निमित्त याही वर्षी अभिवादन कार्यक्रम घेण्यात आला. कार्यक्रमात माजी ग्रामपंचायत सदस्त दिनकर पुंजाबा शिरसाट यांच्या पत्नी उषाबाई दिनकर शिरसाट यांच्या हस्ते पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले. सोबत लाडूबाई शिरसाट यांनीही अभिवादन करून त्रिशरण व पंचशील ग्रहण करण्यात आले.

दिनकर शिरसाट यांनी प्रस्तावना मांडली. तसेच आभार प्रदर्शन वसंता शिरसाट यांनी मानले.

# अजिंठा लेणीत 'म्युझियम ऑन व्हील' उपक्रमास पर्यटकांचा उत्स्फूर्त प्रतिसाद

**फर्दापूर, दि. २६ जून :** जगप्रसिद्ध अजिंठा लेणीच्या पायथ्याशी आज छत्रपती शिवाजी महाराज वस्तुसंग्रहालय, मुंबई यांच्या अद्भुत 'म्युझियम ऑन व्हील' या उपक्रमांतर्गत 'ऐतिहासिक संबंध . भारत आणि प्राचीन विश्व' या विषयावरील एकदिवसीय प्रदर्शनीचे आयोजन करण्यात आले. या अनोख्या प्रदर्शनाला देश-विदेशातील पर्यटक, विद्यार्थी व स्थानिक नागरिकांनी उत्स्फूर्त प्रतिसाद दिला.

या प्रदर्शनीत भारतासह जगातील प्राचीन संस्कृतींचा समृद्ध वारसा आधुनिक पद्धतीने सादर करण्यात आला. भारतातील हडप्पा व मोहेंजोदडो संस्कृती, सुमारे नऊ हजार वर्षे जुनी मेसोपोटेमियन संस्कृती, पाच हजार वर्षांहून अधिक




प्राचीन व रहस्यमय इजिप्शियन संस्कृती तसेच प्राचीन चिनी संस्कृती यांची माहिती चित्रे, प्रतिकृती, माहितीफलक आणि डिजिटल माध्यमांच्या साहाय्याने प्रदर्शित करण्यात आली.

विशेषतः विद्यार्थ्यांसाठी इजिप्शियन संस्कृतीतील चित्रलिपीची माहिती देण्यात आली. प्राणी, पक्षी व विविध चिन्हांच्या साहाय्याने प्राचीन काळात लिपी कशी लिहिली जात होती, याचे प्रात्यक्षिक माहितीपत्रकाद्वारे सादर करण्यात आले. तसेच इ.स. १४३० च्या सुमारास जर्मनीमध्ये प्रचलित असलेल्या 'इंटॅग्लिओ प्रिंटिंग' तंत्राचेही प्रत्यक्ष प्रात्यक्षिक दाखविण्यात आले. पर्यटकांना हे तंत्र स्वतः करून पाहण्याची संधी उपलब्ध करून देण्यात आली.

'म्युझियम ऑन व्हील' ही संकल्पना अत्याधुनिक वातानुकूलित बसमध्ये साकारण्यात आली असून त्यामध्ये आंतरराष्ट्रीय दर्जाच्या गॅलरी उभारण्यात आल्या आहेत. संग्रहालयातील वस्तू, प्रतिकृती व माहितीफलक सुरक्षित राहावेत यासाठी विशेष रचना करण्यात आली आहे. बसमध्ये डिजिटल डिस्प्ले, प्रात्यक्षिक साहित्य व संवादात्मक उपक्रमांची सुविधा उपलब्ध करून देण्यात आली आहे. या प्रदर्शनाला मनोज पवार (संरक्षण सहाय्यक, अजिंठा लेणी), सुधीर बी. मोठे (सहाय्यक पोलीस निरीक्षक, फर्दापूर पोलीस स्टेशन), महादेव हिरवे (प्रबंधक), राज पाटील (प्रबंधक, एमटीडीसी) तसेच भारत कोळी (पोलीस कर्मचारी) यांनी भेट दिली.

यावेळी मनोज मीराबाई प्र. पवार, संरक्षण सहाय्यक, अजिंठा लेणी यांनी सांगितले की, "छत्रपती शिवाजी महाराज वस्तुसंग्रहालयाचा 'म्युझियम ऑन व्हील' हा प्रकल्प अत्यंत स्तुत्य आहे. मुंबईपर्यंत जाऊन संग्रहालय पाहण्याची संधी न मिळणाऱ्या ग्रामीण व आर्थिकदृष्ट्या दुर्बल विद्यार्थ्यांपर्यंत इतिहास, संस्कृती आणि वारसा पोहोचविण्याचे मोठे कार्य या उपक्रमातून होत आहे. पर्यटन, सांस्कृतिक वारसा व जनजागृतीच्या दृष्टीने हा प्रकल्प अत्यंत महत्त्वाचा आहे."

या उपक्रमाबद्दल पर्यटकांनी समाधान व्यक्त करत भारतीय पुरातत्त्व सर्वेक्षण विभाग आणि छत्रपती शिवाजी महाराज वस्तुसंग्रहालय, मुंबई यांचे आभार मानले. विद्यार्थ्यांना व सर्वसामान्यांना इतिहासाची माहिती त्यांच्या दारापर्यंत पोहोचविणारा हा उपक्रम विशेष ठरत असून अजिंठा परिसरात त्याचे मोठ्या प्रमाणात स्वागत करण्यात आले.

# विद्यार्थ्यांच्या कौशल्य विकासासाठी गोदावरी कनिष्ठ महाविद्यालय आणि निर्माण फाउंडेशनची भागीदारी

**छत्रपती संभाजीनगर, प्रतिनिधी :** विद्यार्थ्यांच्या कौशल्य विकासाला चालना देत त्यांना रोजगाराभिमुख शिक्षणाच्या मुख्य प्रवाहात आणण्यासाठी गोदावरी कनिष्ठ महाविद्यालय, हडको, छत्रपती संभाजीनगर (कला, विज्ञान, एच.एस.सी. व्होकेशनल व नर्सिंग विभाग) आणि इन्फोसिस-निर्माण फाउंडेशन यांच्यामध्ये सामंजस्य करार (MoU) संपन्न झाला. किसान शिक्षण प्रसारक मंडळ, बोरगाव काळेचे सचिव तथा मराठवाड्याचे शिक्षक आमदार मा. विक्रमजी काळे यांच्या मार्गदर्शनाखाली हा करार करण्यात आला.



महाविद्यालयाच्या प्राचार्या शुभांगीताई शिवाजीराव सूर्यवंशी आणि निर्माण फाउंडेशनचे सेंटर मॅनेजर इरफान खान यांनी सामंजस्य करारावर स्वाक्षऱ्या करून भागीदारीला औपचारिक स्वरूप दिले. कार्यक्रमाची सुरुवात उत्साहपूर्ण वातावरणात झाली. यावेळी महाविद्यालयाच्या वतीने निर्माण फाउंडेशनच्या प्रतिनिधींचे पुष्पगुच्छ देऊन स्वागत करण्यात आले. तसेच शाल व पुष्पगुच्छ प्रदान करून त्यांचा सन्मान करण्यात आला.

या प्रसंगी एच.एस.सी. व्होकेशनल विभाग प्रमुख प्रशांत दंदे, कला विभाग प्रमुख हरिदास सोमवंशी, विज्ञान विभाग प्रमुख डॉ. सुनील शेरखाने, नर्सिंग विभाग प्रमुख नितीन कवडे, विद्या शेरकर, प्रल्हाद जाधव, प्रदीप डोणगावे, झाकीर शेख, दिलीप बोर्डे, विवेक तेरकर, मीना नागे, महादेव मुंढे, कृष्णा भोयरेकर, प्रविण लोहार तसेच महाविद्यालयातील शिक्षक व कर्मचारी वर्ग उपस्थित होता. निर्माण फाउंडेशनतर्फे सेंटर मॅनेजर इरफान खान, प्लेसमेंट मॅनेजर विशाल म्हस्के आणि सॉफ्ट स्किल्स प्रशिक्षक विकास उक्कलकर यांनी उपस्थित राहून विद्यार्थ्यांसाठी राबविण्यात येणाऱ्या विविध उपक्रमांची माहिती दिली. या सामंजस्य करारामुळे विद्यार्थ्यांना कौशल्य विकास प्रशिक्षण, व्यक्तिमत्त्व विकास, करिअर मार्गदर्शन, रोजगाराभिमुख प्रशिक्षण, उद्योग क्षेत्राशी संपर्क तसेच प्लेसमेंटच्या संधी उपलब्ध होणार आहेत. शिक्षण, कौशल्य आणि रोजगार यांचा प्रभावी सेतू निर्माण करून विद्यार्थ्यांचे भविष्य अधिक सक्षम करण्याचा दोन्ही संस्थांचा सामायिक उद्देश असल्याचे यावेळी सांगण्यात आले. भविष्यात विविध शैक्षणिक, कौशल्यवर्धन आणि रोजगाराभिमुख उपक्रमांच्या माध्यमातून ही भागीदारी अधिक परिणामकारक ठरेल, असा विश्वास व्यक्त करण्यात आला.

# राष्ट्रवादी शिक्षक संघाचे शिक्षणाधिकारी यांना निवेदन

**जालना :** गुरुवार रोजी राष्ट्रवादी शिक्षक संघाच्या वतिने जालना माध्यमिक शिक्षणाधिकारी बाळासाहेब खरात यांची भेट घेऊन त्यांना शिक्षण संचालक यांनी काही दिवसांपूर्वी काढलेल्या परीपत्रकाची त्वरीत अमलबजावणी करावी या प्रमुख मागणी सह इतर अन्य मागण्याचे निवेदन शिक्षणाधिकारी माध्यमिक श्री बाळासाहेबजी खरात व उप . शिक्षणाधिकारी अनिलजी पवार यांना देण्यात आले. शिक्षण संचालनालय महाराष्ट्र राज्याचे शिक्षण सचिव यांनी दि.10 मार्च 2026 चे परिपत्रक क्र.1774046 नुसार शाळेत शिक्षक शिक्षकेत्तर कर्मचारी शाळेत हजर झाल्याबरोबर कर्मचारी उपस्थितीपटावर स्वाक्षरी करुण देणे बाबत स्पष्ट आदेश असतांना सुद्धा सदरील आदेशाची जिल्ह्यातील अनेक



शाळांमध्ये पायमल्ली केली जाते अंमलबजावणी होताना दिसत नाही .तसेच शिक्षण सचिवाचे दि.28 सप्टे.2025 रोजीचे परीपत्रकानुसार वार्षिक वेतनवाढ जुजबी कारणच्या आधारे थांबवता येत नाही.तरी सुद्धा काही शालेय स्तरावरुन शाळेतील शिक्षकांची कोणती कारण नसताना वार्षिक वेतनवाढ करीत नाही,ही बाब अतिशय गंभीर असून शिक्षकांवर अन्याय करणारी आहे तरी आपल्या स्तरावरून वरील बाबींवर तात्काळ अमलबजावणी होण्यासाठी जिल्ह्यातील सर्व शाळांना स्पष्ट आदेश निर्गमित करण्यात यावे. अशी मागणी करणारे निवेदन सादर करण्यात आले. याप्रसंगी राष्ट्रवादी शिक्षक संघाचे वि. उपाध्यक्ष ज्ञानेश्वर टेकाळे, स्वराज्य शिक्षक संघाचे राज्यध्यक्ष ज्ञानेश चव्हाण , पदविधर मतदार नोंदणीचे प्रमुख संजय राऊत , प्रभाकर मोरे, अशोक कांबळे आदींची उपस्थिती होती

दैनिक हिंदू प्रकाशवार्ता
PRGI No.: MHMAR/25/A2358 सत्याचा प्रकाश, राष्ट्रवादाचा प्रहरी



# छत्रपती शाहू महाराज जयंतीनिमित्त मनपातर्फे अभिवादन



हिंदू प्रकाशवार्ता :प्रतिनिधी

**छत्रपती संभाजीनगर :** महानगरपालिकेच्या वतीने राजर्षी छत्रपती शाहू महाराज यांच्या जयंतीनिमित्त आज मिल कॉर्नर येथील त्यांच्या पुतळ्यास पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले.

यावेळी महापौर समीर राजुरकर, स्थायी समितीचे सभापती अनिल मकरिये आणि मनपा आयुक्त अमोल येडगे यांच्या हस्ते पुष्पहार अर्पण करण्यात आला.

कार्यक्रमास नगरसेविका कीर्ती शिंदे, उपआयुक्त नंदकिशोर भोंबे, मुख्य उद्यान अधीक्षक विजय पाटील, मुख्य अग्निशमन अधिकारी अशोक खांडेकर, सहायक आयुक्त लता पुजारी, रमेश मोरे, वॉर्ड अभियंता कुलकर्णी, माहिती व जनसंपर्क अधिकारी तौसीफ अहमद तसेच माहिती व जनसंपर्क विभागाचे रविंद्र खरात, संतोष कोठाळे, करण साळवे आदी अधिकारी व कर्मचारी उपस्थित होते.

# राजर्षी शाहू महाराजांना जिल्हा परिषदेत अभिवादन 'सामाजिक न्यायाचा मार्ग दाखवणारे राजर्षी शाहू महाराज मानवतेचे प्रतीक' : बालाजी सोनटक्के



हिंदू प्रकाशवार्ता : प्रतिनिधी

**छत्रपती संभाजीनगर :** सामाजिक न्यायाचा विचार प्रत्यक्ष कृतीत उतरवून समाजपरिवर्तन घडविणारे राजर्षी छत्रपती शाहू महाराज हे मानवतेचे प्रतीक होते, असे प्रतिपादन जिल्हा परिषद समाज कल्याण समितीचे सभापती बालाजी सोनटक्के यांनी केले.

'सामाजिक न्याय दिन' निमित्त राजर्षी छत्रपती शाहू महाराज यांच्या जयंतीनिमित्त जिल्हा परिषदेच्या वेरूळ सभागृहात अभिवादन कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले. यावेळी ते बोलत होते. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी समाज कल्याण अधिकारी बाबासाहेब अरवत उपस्थित होते.

यावेळी बोलताना बालाजी सोनटक्के म्हणाले की, राजर्षी शाहू महाराजांची कारकीर्द आदर्शवत होती. तत्कालीन दुष्काळाच्या काळात त्यांनी सामान्य जनतेच्या हितासाठी घेतलेले निर्णय आणि राबविलेल्या लोककल्याणकारी योजना आजही प्रेरणादायी आहेत. सामाजिक समता, शिक्षण आणि दुर्बल घटकांच्या उन्नतीसाठी त्यांनी केलेले कार्य आजच्या पिढीसाठी दिशादर्शक असल्याचेही त्यांनी सांगितले. कार्यक्रमास लेखाधिकारी मामीलवाड, सोनकांबळे, ढाकणे, बबन आरसुळ, प्रशांत पाटील, ज्ञानेश्वर कवडे, कैलास मोरे, अतुल पिंपरकर, विजेंद्र डकले यांच्यासह जिल्हा परिषदेचे अधिकारी व कर्मचारी उपस्थित होते.

# घाटीत राजर्षी छत्रपती शाहू महाराज यांना जयंतीनिमित्त अभिवादन



हिंदू प्रकाशवार्ता : प्रतिनिधी

**छत्रपती संभाजीनगर :** शासकीय वैद्यकीय महाविद्यालय व रुग्णालय (घाटी) येथे राजर्षी छत्रपती शाहू महाराज यांच्या १५२ व्या जयंतीनिमित्त अभिवादनाचा कार्यक्रम उत्साहात पार पडला. यावेळी अधिष्ठाता डॉ. शिवाजी सुक्रे यांनी शाहू महाराजांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून अभिवादन केले.

कार्यक्रमास कर्करोग रुग्णालयाचे विशेष कार्य अधिकारी डॉ. अरविंद गायकवाड, विभागप्रमुख डॉ. प्रसाद देशपांडे, डॉ. सलमान शेख, डॉ. सचिन देगावकर, डॉ. अमोल निलेवाड, डॉ. सुदर्शन शिंदे, ग्रंथपाल डॉ. संतोष शेळके, प्रशासकीय अधिकारी दिलीप गोधने, प्रशासकीय अधिकारी राजेंद्र मोरे, लघुलेखक नरेश सानप, लिपिक मुराद बेग तसेच एमबीबीएसचे विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

यावेळी ग्रंथपाल डॉ. संतोष शेळके यांनी राजर्षी छत्रपती शाहू महाराज यांच्या जीवनकार्याचा व सामाजिक न्यायासाठी दिलेल्या योगदानाचा आढावा घेतला. अधिष्ठाता डॉ. शिवाजी सुक्रे यांनी शाहू महाराजांचे विचार आजही समाजाला प्रेरणा देणारे असल्याचे सांगून शिक्षण, सामाजिक समता आणि वंचित घटकांच्या उन्नतीसाठी त्यांनी केलेले कार्य विद्यार्थ्यांसाठी आदर्श असल्याचे नमूद केले.

# नैराष्याने विद्यार्थ्याची आत्महत्या

हिंदू प्रकाश वार्ता प्रतिनिधी.



**परभणी:** आपल्या वडिलांचे अचानकपणे अपघाती निधन झाल्यानंतर नैराष्य सहन न झाल्याने शहरातील तरुण वकील मुलाने आपल्या राहत्या घरी ही घटना गुरुवारच्या 25 जूनरोजी रात्री अकराच्या सुमारास घडली. प्रकरणी नवामोंढापोलीस ठाण्यात अकस्मात मृत्यूची नोंद करण्यात आली आहे. बळीरामजी सटवाजी पतंगे यांनी ही माहिती दिली. देवराज नागोराव अन्नपूर्णे असे मयत खबर देणार यांचे साडू असलेले अन्नपूर्णे यांच्या वडिलांचे अपघातात निधन झाले होते या घटनेनंतर देवराज अन्नपूर्णे नैराश्यात गेले होते. यातच त्यांनी आपल्या राहत्या घरी हॉलमध्ये दोरीच्या साह्याने पण चला गळफास लावून आत्महत्या केली नवा मुंडा पोलिसात अकस्मात मृत्यूची नोंद करण्यात आली असून पोलीस हवालदार सचिन बुरसुडकर हे अधिक तपास करीत आहेत.

# महाविद्यालयांना संलग्नीकरणासाठी दंड भरणे अनिवार्य; आतापर्यंत 225 पैकी 50 महाविद्यालयांनी भरला दंड

## विद्यार्थी विकास मंडळाचे ’नाहरकत प्रमाणपत्र’ गरजेचे, विद्यार्थी विकास मंडळ बैठक

**छत्रपती संभाजीनगर, दि.२५ :** युवक महोत्सवात सहभाग न घेतल्या प्रकरणी दंड भरल्याशिवाय सन २०२६-२७ या शैक्षणिक वर्षाची सलगणीकरण प्रवेशप्रक्रिया राबविता येणार नाही. या संदर्भात विद्यार्थी विकास मंडळाचे ’नाहरकत प्रमाणपत्र’ जमा करणे अनिवार्य असून २२५ पैकी ५० महाविद्यालयांनी आजपर्यंत दंड भरला आहे, अशी माहिती संचालक डॉ.कैलास अंभुरे यांनी दिली.



डॉ.बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठाच्या विद्यार्थी विकास मंडळ समितीची बैठक मा.कुलगुरु डॉ.विजय फुलारी यांच्या अध्यक्षतेखाली व्यवस्थापन परिषद कक्षात नुकतीच झाली. या बैठकीस प्रकुलगुरु डॉ.प्रवीण वक्ते, कुलसचिव डॉ.प्रशांत अमृतकर यांच्यासह प्रा.दिलीप महालिंगे व डॉ.किशोर शिरसाठ हे सदस्य उपस्थित होते. तसेच निमंत्रित सदस्य अॅड.दत्ता भांगे, जिल्हा समन्वयक डॉ.संदिप देशमुख, डॉ.देवराज दराडे, डॉ.समाधान इंगळे तसेच सदस्य सचिव डॉ.वैâलास अंभुरे यांची उपस्थिती होती. बैठकीत चर्चा होऊन पुढील निर्णय घेण्यात आले.ः युवक महोत्सवाचा दंड ज्या महाविद्यालयाने भरला नाही. त्या महाविद्यालयांचे संलग्निकरण व प्रवेश प्रक्रिया थांबवावी असा निर्णय घेण्यात आला. तसेच कोणत्याही महाविद्यालयाचा दंड माफ करण्यात येणार नाही, असेही सर्वानुमते ठरले. जिल्हा युवक महोत्सव १ ते १२ सप्टेंबर या दरम्यान आयोजित करण्यात येणार आहे. जिल्हा युवा महोत्सवाकरिता आयोजक महाविद्यालयाकडून १३ ते १८ जुलै या दरम्यान प्रस्ताव मागविण्यात यावे, तसेच प्रस्ताव प्राप्त झालेल्या महाविद्यालयांची बैठक २७ जुलै रोजी आयोजित करण्यात येणार आहे. महोत्सवाकरिता वैयक्तिक कला प्रकारांचे प्रवेश शुल्क रु.१०० ऐवजी १५० रुपये आणि सांघिक कला प्रकारचे रु.२०० ऐवजी ३०० रुपये असे करण्यात आले. केंद्रीय युवा महोतसव ५ ते ७ ऑक्टोबर या दरम्यान आयोजित करण्यात येईल. १ ते १० ऑगस्ट २०२६ या दरम्यान युवा महोत्सवाची नोंदणी प्रक्रिया सुरु ठेवण्यात येणार आहे. विद्यापीठाच्या संघासाठी नाटयशास्त्र विभागात कार्यशाळा घेण्यात येईल आहे. इंद्रधनुष्यच्या संघाची कलावंतांची निवड करण्यासाठी परीक्षकांव्यतिरिक्त स्टेजनिहाय एका निरीक्षकाची नेमणूक करण्यात येणार आहे. महाविद्यालयातील समन्वयकासाठी ऑनलाईन उदबोधन शिबीराचे आयोजन करण्यात येणार आहे. प्रत्येक संघाने किमान पाच कला प्रकारात सहभाग घेणे आवश्यक असून २ सांघिक, ३ वैयक्तिक कला प्रकारात सहभागी होणे बंधनकारक करण्यात आले आहे.

*२२५ महाविद्यालयांकडे दंडाची रक्कम बाकी*

सन २०२४-२५ या शैक्षणिक वर्षात युवक महोत्सवात सहभाग न घेतलेल्या ३०२ महाविद्यालयांना प्रत्येकी दहा हजारांचा दंड सुनावण्यात आला. यापैकी २२९ महाविद्यालयांनी दंडाची रक्कम भरली आहे. असून आणखी ७३ महाविद्यालयाकडे दंड भरणे बाकी आहे. तर सन २०२५-२६ या वर्षातील २२५ महाविद्यालयांपैकी आजपर्यंत केवळ ५० महाविद्यालयांनी दंडाची रक्कम भरली आहे. उर्वरित महाविद्यालयांनी तत्काळ दंडाची रक्कम भरुन ’नाहरकत प्रमाणपत्र’ घेऊन जावे, असे आवाहन संचालक डॉ.कैलास अंभुरे यांनी केले आहे.

# सामाजिक न्याय दिनानिमित्त 'नशामुक्त भारत अभियान' अंतर्गत सामूहिक शपथ

## राजर्षी छत्रपती शाहू महाराज जयंतीनिमित्त कार्यक्रम; संजय शिरसाठ यांची प्रमुख उपस्थिती

हिंदू प्रकाशवार्ता : प्रतिनिधी

**छत्रपती संभाजीनगर :** सामाजिक न्याय दिन तसेच राजर्षी छत्रपती शाहू महाराज यांच्या जयंतीनिमित्त खोकडपुरा येथील सामाजिक न्याय भवनात 'नशामुक्त भारत अभियान' अंतर्गत सामूहिक नशामुक्ती शपथ कार्यक्रम उत्साहात पार पडला.




या कार्यक्रमास पालकमंत्री तथा सामाजिक न्यायमंत्री संजयजी शिरसाठ, जिल्हा परिषद समाज कल्याण सभापती बालाजी सोनटक्के, प्रादेशिक उपायुक्त समाज कल्याण डॉ. दीपक खरात, सहाय्यक आयुक्त समाज कल्याण आर. एम. शिंदे आणि जिल्हा समाज कल्याण अधिकारी बाबासाहेब अरवत यांची प्रमुख उपस्थिती होती.

यावेळी नगरसेविका हर्षदा ताई शिरसाट, माजी महापौर त्र्यंबक तुपे, विकास जैन तसेच सर्वोदय व्यसनमुक्ती संस्थेचे अध्यक्ष विलास चंदने यांच्यासह विविध क्षेत्रांतील मान्यवर उपस्थित होते.

कार्यक्रमादरम्यान उपस्थित मान्यवर, अधिकारी, कर्मचारी तसेच नागरिकांनी 'नशामुक्त भारत अभियान' अंतर्गत व्यसनमुक्तीची सामूहिक शपथ घेतली. व्यसनमुक्त, निरोगी आणि सुदृढ समाजाच्या निर्मितीसाठी प्रत्येक नागरिकाने सक्रिय सहभाग नोंदवावा, असे आवाहन यावेळी मान्यवरांनी केले.

कार्यक्रमास सामाजिक न्याय विभागाचे अधिकारी व कर्मचारी, विविध सामाजिक संस्थांचे प्रतिनिधी तसेच नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# बातमीचा परिणाम : तरुणांमध्ये नवचैतन्य; निवडणुकीमध्ये तरुणांचा सहभाग

हिंदू प्रकाशवार्ता । प्रतिनिधी

**गल्ले बोरगाव :** आता लोकशाहीचा पवित्र उत्सव येत आहे. सध्या गल्ले बोरगाव गावामध्ये निवडणुकीची चर्चा चांगलीच रंगात निर्माण करत आहे.


बोरगावात हौसे, नवसे व गवशे निवडणूक रिंगनात ?


या निवडणुकीमध्ये पहिल्यांदाच सर्व समाजातील तरुणांनी चांगलाच रस दाखवायला मिळत आहे. या निवडणुकीमध्ये समाजासाठी, गावासाठी, विद्यार्थ्यांसाठी, समाजसेवा करणारे युवक निवडणूक म्हटली की, बाजूला निघून जायचे,परंतु या वेळेस तरुणांनी चांगलीच या निवडणुकीमध्ये रंगत निर्माण करण्याची शक्यता वर्तवली जात आहे. यासाठी सर्व स्तरातील तरुण एकत्र येऊन काही अनुभवी तज्ञांच्या मार्गदर्शनाखाली निवडणुकीच्या माध्यमातून जनतेच्या, गावाच्या, समाजसेवेसाठी पुढे येताना दिसत आहे. चांगले शिकलेले तरुण स्वतःचा प्रपंच सांभाळून, व्यवसाय सांभाळून, शेती उद्योग सांभाळून, कार्यक्षमता असलेले तरुण, निर्व्यसनी असं तरुणांचा एक गट पुढे येऊन 100% समाजसेवा करण्यासाठी पुढे येताना दिसत आहे. ही चर्चा दररोज बस स्टॉप, वर चहाच्या हॉटेलमध्ये, टपरीवर संध्या रंगात आहे.गावातील तरुणांना राजकारणात आले पाहिजे जनहिताची कामे सामाजिक सदभावना घेवुन तळागाळातील जनतेची कामे मार्गी लावण्यासाठी कसोशीने प्रयत्न करावे हाच एकमेव धोरण या निवडणुकीत उतरुन समाजातील प्रत्येक वंचित घटकांना न्याय मिळावा या साठी सदैव प्रयत्नशील राहण्याचा निर्धार करत नवचैतन्य निर्माण करण्याच्या भुमिकेतुन आणि सर्वागिंण विकासाच्या मुद्दयावर निवडणुक लढवण्याचा चंग बांधुन गावातील सर्व तरुण मंडळी एकोप्याने ही निवडणुक लढतील असेच सध्या तरी चित्र पाहावयास मिळत आहे.

# पत्रकारांना धमक्या ; खा. संजय दिना पाटील यांच्यावर गुन्हा दाखल करण्याची मागणी



हिंदू प्रकाश वार्ता प्रतिनिधी

**परभणी :** पत्रकारांना शिवीगाळ करणाऱ्या खा. संजय दिना पाटील यांच्यावर तात्काळ गुन्हा दाखल करुन कारवाई करण्यात यावी या मागणीसाठी परभणी जिल्हा मराठी पत्रकार संघाचे वतीने परभणीचे मा. पोलीस अधिक्षक यांच्या मार्फत मुख्यमंत्री तथा गृहमंत्री यांना पाठवण्यात आले आहे.

या निवेदनात म्हटले आहे की, पत्रकारांवर दिवसेंदिवस हल्ले होत आहेत. तसेच आता तर लोकप्रतिनिधीही पत्रकारांना धमक्या देत आहेत. ही लोकशाहीच्या दृष्टीने गंभीर बाब आहे. शिवसेना (शिंदे गट) चे खासदार संजय दिना पाटील यांनी पत्रकारांशी बोलतांना त्यांना शिवीगाळ केली तसेच असभ्य भाषेत बोलून धमकी दिली आहे. हा प्रकार लोकशाहीला काळीमा फासणारा आहे. लोकशाहीच्या चौथ्या स्तंभावर जर लोकप्रतिनिधीच जर अशा प्रकारे वागत असतील तर ही निंदनिय बाब आहे. खा. संजय दिना पाटील यांच्या प्रकारानंतर राज्यभरातील पत्रकारांमधून संतप्त प्रतिक्रीया उमटत असून या प्रकरणी उच्चस्तरीय चौकशी करुन खा. संजय दिना पाटील यांच्यावर तात्काळ गुन्हा नोंदवून त्यांच्यावर कारवाई करण्यात यावी, अशी मागणी करण्यात आली

या निवेदनावर संघटनेचे अध्यक्ष प्रभू दिपके, प्रदेश कार्यकारणी सदस्य राजकुमार हट्टेकर,कार्याध्यक्ष लक्ष्मण मानोलीकर, कोषाध्यक्ष मोईन खान,उपाध्यक्ष विठ्ठलराव वडकुते,पत्रकार हल्ला विरोधी कृती समितीचे अध्यक्ष रामेश्वर शिंदे,प्रसिध्दी प्रमुख सुधाकर श्रीखंडे,प्रकाश साळवे, अशोक पवार लक्ष्मीकांत बनसोडे,शिवशंकर सोनुने, धाराजी भुसारे, मोहसीन खान शिवाजी वाकोडे,संघपाल आढागळे,मंदार कुलकर्णी, पांडुरंग अभुरे,अनिल दाभाडकर,अरुण रणखांबे, सुनिल सुतारे, दिलीप बोरकर, संजय घनसावंत आदी उपस्थित होते.

# राजर्षी शाहू महाराज यांच्या जयंतीनिमित्त भूमिपुत्र जन पार्टीच्या वतीने विनम्र अभिवादन!

**छत्रपती संभाजीनगर प्रतिनिधी :** आरक्षणाचे जनक आणि थोर समाजसुधारक राजर्षी शाहू महाराज यांच्या जयंती दिनानिमित्त "भूमिपुत्र जन पार्टी"च्या वतीने त्यांना भावपूर्ण व विनम्र अभिवादन करण्यात आले. सिडको भागातील एन-८ येथील ६०, जम्बूद्वीप कीर्ती हाऊसिंग सोसायटीमध्ये या अभिवादन सभेचे विशेष आयोजन करण्यात आले होते. या अभिवादन सभेला विविध क्षेत्रांतील मान्यवर आणि पक्षाचे पदाधिकारी मोठ्या संख्येने उपस्थित होते. यामध्ये ज्येष्ठ नेते अॅड. नरहरी कांबळे, भूमिपुत्र जन पार्टीचे संस्थापक मधुकरराव भोळे, साहेबराव नलावडे, किशोर नरवडे, जितेंद्र जाधव आणि किरण कुमार भोळे इत्यादी प्रमुख नेत्यांचा समावेश होता. उपस्थित मान्यवरांनी राजर्षी शाहू महाराजांच्या प्रतिमेला पुष्पहार अर्पण करून अभिवादन केले आणि त्यांच्या सामाजिक चळवळीतील व बहुजनांच्या कल्याणातील ऐतिहासिक योगदानाचा गौरव केला. या अभिवादन सभेदरम्यान एक महत्त्वाचा ठराव मांडण्यात आला. राजर्षी शाहू महाराजांनी बहुजन समाज, वंचित आणि कामगारांसाठी केलेले कार्य अथांग आहे. त्यामुळे त्यांच्या या महान कार्याचा सन्मान राखत केंद्र सरकार आणि महाराष्ट्र सरकारने शाहू महाराजांच्या जयंती दिनी संपूर्ण देशात व राज्यात सार्वजनिक सुट्टी जाहीर करावी, अशी आग्रही मागणी भूमिपुत्र जन पार्टीच्या वतीने करण्यात आली. या सभेला परिसरातील नागरिक आणि पक्षाचे कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते.



# व्यंकटराव एकनाथराव बनसोडे यांचे निधन



छत्रपती संभाजीनगर : व्यंकटराव एकनाथराव बनसोडे यांचे वयाच्या 90 व्या वर्षी आज दिनांक 26 जुन 2026 रोजी पहाटे 1.00 वा. वृध्दपकाळाने दुःखद निधन झाले ,त्यांचा अंत्यविधी सकाळी ठिक 11.45 वा. जुना भावसिंगपुरा (पडेगाव रोड) दर्गा रोड, ग्लोरिया अपार्टमेंट समोर ,छत्रपती संभाजीनगर येथिल स्मशानभूमीत करण्यात आला.त्यांच्या पश्चात पत्नी दोन मुले, दोन मुली, सुना, जावाई , नातवंडे असि मोठा परिवार आहे.

# सरसकट कर्जमाफीसाठी एल्गार अन्नदात्यांच्या आंदोलनात सर्व शेतकऱ्यांनी सहभागी व्हावे - आ.रोहित पवार

## आमदार रोहित पवार यांची राष्ट्रवादीभवन येथे पत्रकार परिषद., 29 जूनला छत्रपती संभाजी नगर येथे राजव्यापी आंदोलन

हिंदू प्रकाश वार्ता प्रतिनिधी.

**परभणी,:** महाराष्ट्र राज्य शासनाने शेतकऱ्यांच्या कर्जमाफी योजनेला पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर नाव दिले 80 टक्के शेतकरी अपात्र ठरले. आहे त्यामुळे महाराष्ट्र राज्य शासनाकडून महामानवाचा अपमान केल्याचा आरोप आ. रोहित पवार यांनी केला आहे. शेतकऱ्यांच्या सरसकट कर्जमाफीसाठी मोठ्या संख्येने सहभागी व्हावे असे आवाहन राष्ट्रवादी भवन येथे घेतलेल्या पत्रकार परिषदेमध्ये केले.

येता 29 जून रोजी छत्रपती संभाजीनगर येथे सर्वपक्षीय एल्गार अन्नदात्याचा आंदोलन करण्यात येणार असल्याचे त्यांनी सांगितले. सरकारने कर्जमाफी देताना दोन जाचक अटी घातल्या आहेत. पहिली अट अशी 2019 ला कर्जमाफीचा लाभ घेतलेला असल्यास आत्ताच्या योजनेत केवळ पन्नास हजार रुपये तुला मिळेल म्हणजे 36 लाख शेतकऱ्यांपैकी 90 टक्के शेतकऱ्यांचे पीक कर्ज दोन लाख रुपये आहे त्यांना दीड लाख रुपये भरल्यावर पन्नास हजार रुपये अनुदान मिळेल. दुसरी अट अशी नियमित कर्ज भरणाऱ्या शेतकऱ्यांना 2025 26 आणि 26 27 चे कर्ज भरल्यानंतर पन्नास हजार रुपये प्रोत्साहन पर अनुदान मिळेल या अटीमुळे जवळपास 15 लाख शेतकऱ्यांना सात हजार कोटी रुपयांचा फटका बसणार आहे. महाराष्ट्र राज्य सरकारने या की रद्द करून सरसकट कर्जमाफी करावी यासाठी मराठवाड्यात 29 जून रोजी छत्रपती संभाजीनगर येथे केंब्रिज चौकात एल्गार अन्नदाता आंदोलन करण्यात येणार असून यावेळी काँग्रेस



उभाठा शिवसेना शेतकऱ्यांच्या विविध संघटना तसेच सर्वपक्षीय नेते शेतकरी हजारो संख्येने सहभागी होणार असल्याचे त्यांनी सांगितले चालू अधिवेशनात सरसकट कर्जमाफीचा शब्द दिल्याशिवाय मस्त बसणार नाही सरकारने शब्द दिला नाही तर पुढे जाऊन जेलभर आंदोलन करण्यात असल्याचे त्यांनी पत्रकार परिषदेत सांगितले परभणी जिल्ह्याच्या शेतकऱ्याच्या प्रश्नावर बोलताना पवार पुढे म्हणाले की गेल्या वर्षी 4.94 लाख हेक्टर पिकाचे नुकसान झाले होते याकरिता शासनाकडून 1800 कोटीची मदत मिळणे अपेक्षित होती. मात्र मिळाले फक्त 145 कोटी त्यामुळे शेतकऱ्यांना तुटपुंजी मदत मिळालीआहे. अतिवृष्टी दुष्काळ शेवटचे उत्पादन यावर अभ्यास करून उपाययोजना कराव्यात भाजपामधील अंतर्गत कलाह वर आमदार रोहित पवार म्हणाले की राज्यातील व केंद्रातील भाजपामध्ये चालू असलेला वाद केंद्रातील भाजपा एकनाथ शिंदे यांना बळ देत आहेत तर राज्यातील भाजपा मुख्यमंत्री यांना बळ देत आहेत त्यामुळे फडणवीस हे शिंदे यांची अडवणूक करत आहेत आर्थिक बळ लावल्यामुळे खासदार कुठले असावे असा दावा त्यांनी केला भाजपाला अजून 40 खासदारांची गरज आहे पण ते मिळतील असे वाटत नाही 2029 च्या लोकसभेत आपण निवडून येणार नाही. हे माहीत असल्यामुळे खासदार फोडून डिलीमिटेशन करण्याचा भाजपचा प्रयत्न आहे राष्ट्रवादी काँग्रेसचे चंद्र पवार पक्षातून आमचा कोणताही आमदार खासदार उठणार नाही ही केवळ चर्चा आहे असा विश्वास त्यांनी यावेळी व्यक्त केला माजी खासदार पूजा खान माजी आमदार विजय गव्हाणे जिल्हाध्यक्ष अजय गव्हाणे नरेंद्र काळे भीमराव हाथी अंबिरे ऍड माधुरी क्षीरसागर कांतराव देशमुख झरीकर लिंबाजी कचरे अमृत कदम माणिक कदम शिवाजी कदम ओमकार पवार राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाचे पदाधिकारी शेतकरी व विविध संघटनेचे पदाधिकारी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

मुख्य कार्यालय : ऑफिस नं. 515, 5 वा मजला, वास्तू इलाईट स्क्वेअर, बजाज हॉस्पिटल समोर, बीड बायपास रोड, छत्रपती संभाजीनगर- 431010

हे पत्र प्रकाशक, मालक श्री. रोहित विकास पाटील यांनी मुद्रक श्री. सय्यद परवेझ अहेमद सय्यद इनायत अली यांच्यामार्फत रेड प्रिंटस् , सी-15, संजयनगर, बायजीपुरा, छत्रपती संभाजीनगर-431001 येथे छापून तिरुपती सुप्रीम एन्क्लेव्ह, जालान नगर, छत्रपती संभाजीनगर- 431001 येथून प्रकाशित केले. ▌संपादक : रोहित विकास पाटील ▌email : hinduprakashvarta@gmail.com ▌epaper.hinduprakashwarta.com ▌PRGI No.: MHMAR/25/A2358 ▌संपर्क क्र. : 7261999911